# सृजनरंग

अंक – ५

ऑक्टोबर २०२३



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष : सृजनरंग : अंक – ५

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रेरणा** : **मा. रणजितसिंह देओल,** (भा.प्र.से.)
  मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा. सूरज मांढरे,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : **कौस्तुभ दिवेगावकर,** (भा.प्र.से.)
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक** : **रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. नेहा बेलसरे**
  उपसंचालक तथा विभाग प्रमुख (आयटी व प्रसारमाध्यम)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

  **मनिषा यादव**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती समन्वयक** : **सुवर्णा पवार**
  उपशिक्षिका, जि. प. प्राथ. शाळा आर्वी, ता. हवेली, जि. पुणे तथा राज्य अभ्यासगट सदस्य, गणित
- **तज्ज्ञ समिती** : **डॉ. संदीप पवार**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी

  **राणी पाटील**
  अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर

  **संदीप वाकचौरे**
  उपशिक्षक, जि. प. प्राथ. शाळा कोंची, ता. संगमनेर, जि. अहमदनगर तथा राज्य अभ्यासगट सदस्य

  **सुवर्णा देशपांडे**
  माध्यमिक शिक्षिका, डे. ए. सो. चे न्यू इंग्लिश स्कूल, सातारा

  **निवृत्ती आहेर**
  मुख्याध्यापक, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय आदर्श शाळा भोयेगाव, जि. नाशिक
- **मुखपृष्ठ रचना** : **नीताली हरगुडे** (कला शिक्षिका, सरिता विद्यालय, पुणे)
- **मलपृष्ठ रचना** : **विवेकानंद पाटील** (कलासाम्राज्यम्, पुणे)
- **प्रथम आवृत्ती** : एप्रिल २०२३
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.




# सृजनरंग

अंक - ५

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याच्या दृष्टीने शिक्षणातील विविध प्रयोगांची देवाणघेवाण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जे जे म्हणून चांगले असेल, ते ते स्वीकारणे आणि नव्याने उत्थान घडविण्यासाठी पावले टाकणे आवश्यक आहे. राज्य शासनाने नव्याने भूमिका घेऊन आदर्श शाळा निर्माण केल्या आहेत. राज्यातील आदर्श शाळांमधील सुरू असणाऱ्या विविध शैक्षणिक प्रयोगांची दखल घेऊन हा अंक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी यापूर्वी वेगवेगळ्या स्वरूपात प्रयत्न सुरू आहेत. त्या प्रयत्नांना निश्चितपणे काही प्रमाणात यशही मिळत आहे. तथापि राज्य सरकारने शिक्षणाच्या गुणवत्तेच्या व प्रयोगशीलतेच्या दृष्टीने आदर्श शाळा महत्त्वपूर्ण आहेत तसेच आदर्श शाळा या भौतिक सुविधांबरोबरच गुणवत्तेच्या दृष्टीने देखील विशिष्ट उंचीवर असायला हव्यात असे सूचित केले. त्या दृष्टीने या शाळांमध्ये अधिक प्रयोगशीलता निर्माण करण्याचे वेगवेगळ्या स्वरूपात प्रयत्न सुरू आहेत. या विविध उपक्रमांमुळे शाळांची गुणवत्ता उंचावण्यास निश्चित मदत झाली आहे. जे जे म्हणून शिक्षणक्षेत्रात चांगले आहे त्या सर्वांचे सार्वत्रिकीकरण होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरून सातत्याने प्रयत्न होत आहेत आणि त्या प्रयत्नांचाच हा एक भाग आहे. शाळांमध्ये सुरू असणारे विविध उपक्रम राज्यातील इतर शाळांपर्यंत पोहोचावेत, तसेच यांपासून प्रेरणा घेऊन नवनवीन उपक्रम आपल्या कल्पकतेने राबवून शालेय गुणवत्तेचा आलेख उंचावण्याच्या उद्‌देशाने 'सृजनरंग' या ई–अंकाची निर्मिती करण्यात आली आहे.

आपण सर्व जण जाणतो की, एकविसावे शतक हे गतिमान असून अनेकाविध क्षेत्रात सातत्याने बदल घडत आहेत. त्या अनुषंगाने सातत्याने समोर येणारी आव्हाने यशस्वीपणे पेलण्यास सक्षम होणे आणि ज्ञान प्राप्त करून कौशल्ये अंगीकृत करणे आवश्यक आहे. एकविसाव्या शतकातील शिक्षण हे सर्जनशील, चिकित्सक विचार, सहयोग, सहकार्य आणि संप्रेषण/संवाद यावर भर देणारे आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने प्रगती झाल्यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या संसाधने उपलब्ध होत असून माहितीचा महासागर सहजगत्या उपलब्ध होत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परिणामकारक अध्ययन–अध्यापन पद्‌धती अवलंबविण्याची गरज आहे. शालेय अभ्यासक्रमातील विषयनिहाय विशिष्ट अथवा क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत अधिक सुलभतेने पोहोचविण्यासाठी शिक्षकांनी विविध तंत्रे व कौशल्ये आत्मसात करणे देखील आवश्यक आहे. यासाठी पूरक कौशल्यांचा समुच्चय शिक्षकांच्या अंगी असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध आव्हांनांचा सामना करण्यासाठी आपल्या ठायी आत्मविश्वास निर्माण करून जीवन सुकर करणे, ही सध्याची गरज आहे. आदर्श शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक गुणवत्ता उंचावण्यासाठी कल्पकतेने विविध उपक्रम राबवत आहेत. 'शाळा एक समूह' म्हणून शालेय स्तरावर विविध उपक्रम राबवत असताना अनेक आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाऊन शालेय गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. हे कार्य निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे. गुणवत्तावाढीबरोबरच सुजाण नागरिकत्व जोपासण्यासाठी नावीन्यपूर्ण विचारधारा आणि उपक्रमांचा स्वीकार करून आपण सृजनशील दिशेने वाटचाल करूया. राज्यातील काही शाळांनी केलेल्या प्रयोगांची दखल या अंकात घेण्यात आली आहे. अशाच उपक्रमांवर आधारित 'सृजनरंग' या ई–अंकाचे आपण नक्कीच स्वागत कराल अशी खात्री आहे. या उपक्रमांमधून आपणाला प्रेरणा मिळेल आणि त्या प्रेरणेतून आपणही आपल्या शाळा अधिक गुणवत्तेच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी प्रयत्न कराल असा विश्वास वाटतो.

**अमोल येडगे** (भा.प्र.से.)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


- **माझी शैक्षणिक वाटचाल** १
  कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, नंदुरबार
- **कृतीतून मनोरंजनात्मक शिक्षण** ३
  कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मोहिदे, ता. शहादा, जिल्हा नंदुरबार
- **गुणवत्तेसाठी उपक्रमांची नांदी** ५
  जि. प. केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा सावरगाव डुकरे, पं. स. चिखली, जि. बुलढाणा
- **कोरोना काळातील उपक्रम** २१
  भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा वरखेड, ता. चिखली, जि. बुलढाणा
- **शालेय उपक्रमांतून विद्यार्थी अभिव्यक्ती** २६
  जि. प. प्राथ. शाळा, कळंबेश्वर, ता. मेहकर, जि. बुलढाणा.
- **शिष्यवृत्तीचा जरगनगर पॅटर्न** ३१
  मनपा श्रीम. लक्ष्मीबाई कृष्णाजी जरग विद्यामंदिर, जरगनगर, कोल्हापूर.
- **पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा** ३३
  जि. प. उच्च प्राथ. शाळा, जोगीसाखरा.
- **ज्ञानी होऊया चिमुकल्यांसंगे** ३५
  जि. प. उ. प्राथ. शाळा पचखेडी (गा.) प. स. कुही, जि. नागपूर
- **चंद्रयान उपक्रमातून विद्यार्थी संशोधनाकडे** ३७
  रा. जि. प. आदर्श मराठी शाळा खरसई, जि. रायगड
- **आदर्श शाळांमधील गुणवत्ताविषयक उपक्रम – शिक्षक सुपरस्टार उपक्रम** ३९

# माझी शैक्षणिक वाटचाल

मी विद्या पडवी. पुणे शहरात मी तृतीय वर्ष (बी.एससी.) फार्मसी शिकत आहे. माझे इयत्ता १ ली ते ४ थी चे शिक्षण जिल्हा परिषद शाळा वेहगी येथे झाले. पण माझ्या घरापासून शाळा खूप लांब होती. त्यामुळे मला रोज शाळेत जाणे शक्य होत नव्हते. चौथी पास झाल्यावर माझे ॲडमिशन 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय नंदुरबार' येथे इयत्ता पाचवीमध्ये झाले.

माझ्या आयुष्याचा खरा प्रवास या शाळेपासून सुरू झाला. सुरुवातीला मला काहीच लिहिता-वाचता येत नव्हते. माझी शिकण्याची सुरुवात अ, आ, ई पासून झाली. या शाळेत रोज शाळा सुरू होण्याआधी जादा तास घेतले जायचे. त्यात आम्हांला प्राथमिक ज्ञान (Basic Knowledge) शिकवले जायचे. यामुळे मला लिहिता-वाचता येऊ लागले. प्रत्येक विषयात आमचा अभ्यास चांगला होत गेला. त्यामुळे गणित, इंग्रजी सारखे विषय सोपे वाटायला लागले. शाळेतील शिक्षकांनी आमच्यासाठी खूप कष्ट घेतले. प्रत्येक शिक्षक खूप कष्टाळू होते. जोपर्यंत आम्हांला येत नाही, तोपर्यंत ते आम्हांला शिकवत असत. आमच्या मॅडम आमच्याबरोबर अगदी प्रेमाने आईप्रमाणे वागायच्या.

अभ्यासाबरोबर मुलींमध्ये इतर कौशल्य निर्माण होण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. जसे, की स्पोकन इंग्लिश, कराटे, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वेगवेगळे खेळ, सामान्यज्ञान इत्यादी. याप्रकारचे वेगवेगळे उपक्रम दरवर्षी राबविले जातात. मला कराटेमध्ये ब्लॅक बेल्ट मिळाला आहे. इतर स्पर्धांमध्ये मी नेहमीच सहभागी व्हायचे. त्यामुळे मी अनेक कौशल्यांमध्ये पारंगत होत गेले. पाचवीला असताना लिहिता-वाचता न येणारी मुलगी या शाळेत येऊन दहावीपर्यंत सगळ्या गोष्टी शिकली. याचे श्रेय मी माझ्या सर्व शिक्षकांना देते. त्यांनी मला प्रत्येक वेळी मार्ग दाखविला. एखादी गोष्ट आली नाही तरी शिक्षक ती परत परत शिकवत असत. चांगले काय, वाईट काय? यापासून सगळ्या व्यावहारिक जीवनातील गोष्टी शिकवल्या. त्यांनी आम्हांला स्वतःच्या मुलींप्रमाणे सर्व काही शिकवले. पुस्तकातील ज्ञान तर आम्हांला मिळालेच, पण अवांतर ज्ञानसुद्धा शिक्षकांनी आम्हांला दिले. या शाळेतील आठवणी मी कधीच विसरू शकत नाही. ते दिवस माझ्यासाठी सोनेरी दिवस होते.

आठवतात ते शाळेतील दिवस. शाळेतील आठवणी कोणी विसरू शकत नाही. या शाळेतूनच आम्ही स्वप्न पाहायला शिकलो. मी जेव्हा दहावीला होते तेव्हा मी कल्पनाही केली नव्हती, की पुढील शिक्षणासाठी मी पुण्यासारख्या शहरात जाईन. दहावीला चांगले गुण मिळाले. मग घरच्यांनी ठरविले की, मला शिकण्यासाठी पुण्यात पाठवायचे. अकरावी-बारावीला विज्ञान शाखा निवडल्यामुळे त्यातच करियर करण्याचे ठरविले. बारावीनंतर मी बी फार्मसीला ॲडमिशन घेतले. मी सध्या बी फार्मसीच्या तृतीय वर्षाला आहे. हेच माझे सगळ्यात मोठे स्वप्न आहे.

सुरुवातीला पुण्यात शिकणे माझ्यासाठी सोपे नव्हते. पुण्यातील वातावरणात जमवून घ्यायला बरेच महिने गेले. पण हळूहळू स्वतःमध्ये बदल केले. मी स्वप्न पाहिले; पण ते पूर्ण करणारे माझे आई–वडील माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. शिक्षकांनी मला वेळोवेळी प्रेरणा दिली. त्यासाठी मी त्यांची खूप आभारी आहे. अ, आ, ई पासून सुरुवात करणारी मुलगी आज मी पुण्यात शिकत आहे. हेच खूप मोठे भाग्य आहे.

*'शिक्षणापेक्षा मोठे कोणतेच वरदान नाही*
*आणि गुरूचा आशीर्वाद मिळणे यापेक्षा मोठा सन्मान नाही.'*

*''गुरूविण न मिळे ज्ञान, ज्ञानाविण जगी न होई सन्मान*
*जीवन भवसागर तराया, चला वंदुया गुरुराया*

हे माझ्या सर्व शिक्षकांना समर्पित !

**विद्या पडवी**
**तृतीय वर्ष (बी.एससी)**
**माजी विद्यार्थिनी,**
**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, नंदुरबार**

✦✦✦

# कृतीतून मनोरंजनात्मक शिक्षण

'पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक' मंडळाच्या शैक्षणिक शाखांपैकी शैक्षणिक वातावरणात असलेली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर योजनेअंतर्गत आदर्श शाळा म्हणजे 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय शहादा.'

निसर्गरम्य वातावरणात असलेल्या एका आनंददायी आदर्श शाळेची यशोगाथा तुमच्यापुढे सादर होत आहे. फेब्रुवारी २००६ मध्ये काही निवडक निकषांच्या आधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाची निर्मिती करण्यात आली. शाळाबाह्य मुली, अनाथ, अपंग, एक पालकत्व, दारिद्र्य रेषेखालील व पुढील शिक्षणाची सोय होणे अशा निकषांवर विद्यार्थिनींना शाळेत प्रवेश दिला जातो. सन २०२२/२३ मध्ये शाळेत सहावी ते दहावीच्या एकूण १६१ विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. शाळा निवासी असून दोन मजली इमारतीत पहिल्या मजल्यावर वर्ग व दुसऱ्या मजल्यावर राहण्याची व्यवस्था आहे.

मुलींची राहण्याची, जेवणाची व्यवस्था येथेच केली जाते. सर्व शैक्षणिक, निर्वाह साहित्य देखील त्यांना शाळेतच दिले जाते. शाळेत विद्यार्थिनींना गुणवत्ता पूरक वातावरणात शिक्षण दिले जात आहे. मागील दोन वर्षांपूर्वी कोविड – १९ च्या प्रभावाखाली शाळा प्रत्यक्षात सुरू नसल्यामुळे म्हणजेच ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थिनी प्रगतीच्या दृष्टीने अभ्यासात मागे पडल्यामुळे त्यांची गुणवत्ता वाढवणे व विद्यार्थिनींची उपस्थिती टिकवून ठेवणे हे आमच्यासाठी एक आव्हानच होते.

आनंददायी कृतियुक्त, मनोरंजनात्मक शिक्षणाचे ध्येय आमच्यासमोर होते. त्यासाठी राज्य स्तरावरून आलेल्या विविध उपक्रमांची आम्हांला मदत झाली. जसे – आनंददायी शिक्षण, गोष्टीचा शनिवार, तसेच शिक्षकांना दिले गेलेले प्रशिक्षण या सर्वांचा आम्हांला भरपूर उपयोग झाला. तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत वेळोवेळी मिळणाऱ्या मार्गदर्शनातून आम्हास योग्य दिशा मिळाली. शाळा गुणवत्ता विकास आराखडा याचे मार्गदर्शन आम्हांस मिळाले. त्याचबरोबर 'शांतीलाल मुथा फाउंडेशन' या संस्थेअंतर्गत आम्हांस मदत मिळाली.

प्रथम विद्यार्थिनींच्या क्षमता पूर्णपणे विकसित करण्यासाठी गणित व भाषा विषयांच्या शिक्षकांनी नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केले. त्यामुळे अध्यापनात रंजकता आणणे सुलभ होत गेले.

दररोज परिपाठाच्या वेळी पाढे म्हणणे, इंग्रजी स्पेलिंग अशा विविध पद्धतीने गुणवत्ता वाढीचा ध्यास लागला. सुरुवातीला विद्यार्थिनी गोंधळल्या; परंतु हळूहळू त्यांचा उत्साह वाढत गेला. आता स्वतःहून विद्यार्थिनी फळ्यावर शुद्ध शब्द, समानार्थी, विरुद्धार्थी शब्द व पाढे लिहितात. मी स्वतः इंग्रजी शिक्षक असल्याने वर्गात स्पेलिंग बॉक्स बनवला, दररोज विद्यार्थिनी स्पेलिंग पाठ करून बॉक्समध्ये चिठ्ठी टाकतात. त्यामुळे अजून जास्तीत जास्त स्पेलिंग पाठ करण्याची स्पर्धा सुरू झाली.

विद्यार्थिनींच्या वाचन क्षमता व संख्या ओळख क्षमता वाढवण्यासाठी गटागटाने क्षमतेनुसार शिकवले गेले. आता अध्ययन स्तर वाढताना दिसून येत आहे. गुणवत्ता वाढीसाठी सहशालेय व अभ्यासपूर्ण असे विविध विषय उपक्रम घेण्यात येत आहेत, जसे – गणित दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा, गणितीय रांगोळ्या तसेच क्रीडा गुणांना वाव मिळावा. म्हणून विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन, दर शनिवारी योगा व कवायत तसेच आत्मसंरक्षणासाठी कराटेचे देखील प्रशिक्षण देण्यात आले. सध्या तंत्रज्ञानाचे युग लक्षात घेता संगणक प्रशिक्षण देखील देण्यात येत आहे.

कबड्डी, खो–खो स्पर्धेत विद्यार्थिनींनी तालुका स्तरावर पहिला नंबर पटकावला, थाळी फेक स्पर्धेत दिपाली रावताळे या विद्यार्थिनीची विभाग स्तरावर निवड झाली. स्पर्धा परीक्षांसाठी एन.एम.एस. व आठवी स्कॉलरशिपसाठी विदयर्थिनींकडून शिक्षक विशेष तयारी करून घेतात यावर्षी एन.एम.एम.एस. परीक्षेत दिव्या वसावे व रोशनी पाडवी यांना अनुक्रमे ८०.८६ व ६८.७२ टक्के मिळाले. स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून, यूट्यूबद्वारे तसेच विविध शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून शिक्षण दिल्यामुळे विद्यार्थिनींचा उत्साह व आत्मविश्वास वाढला.

तसेच आदर्श शाळा योजनेअंतर्गत खान ॲकॅडमीच्या गणित प्रशिक्षणामुळे गणित विषयाची भीती कमी होताना दिसत आहे. थोर नेत्यांच्या जयंती–पुण्यतिथी बालसभेचे आयोजन अशा विविध उपक्रमामुळे विद्यार्थिनींना शाळेची गोडी, आवड निर्माण झाली. विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, यासाठी ३ जानेवारी बालिका दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम राबवले जातात तसेच वेळोवेळी शिक्षक–पालक सभा, माता पालक सभा यांचे देखील आयोजन केले जाते. वेळोवेळी आरोग्य तपासणीदेखील केली जाते.

तालुका स्तरावरून माननीय गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख तसेच आदर्श योजनेचे तालुका नोडल अधिकारी यांच्याकडून योग्य ते मार्गदर्शन मिळते. अशाप्रकारे शाळेची गुणवत्तेकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे.

**पूज्य सानेगुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित**
**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मोहिदे,**
**ता. शहादा, जि. नंदुरबार**

✦✦✦

# गुणवत्तेसाठी उपक्रमांची नांदी

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या विचाराने अख्ख्या जगाला मानवी जीवनात शिक्षण किती महत्त्वाचे आहे हेच दाखवून दिले. शिक्षण ही अशी कला आहे जी माणसाला यशस्वी जीवन जगण्याचे शिकविते. श्री. शैलेश्वर टेकडीच्या कुशीत वसलेले अवघ्या साडेतीनशे घरांचे, एकोप्याने राहणारे एक टुमदार खेडे म्हणजे 'सावरगाव डुकरे'. एकेकाळी आदर्श गाव पुरस्कार मिळालेले हे गाव. तशी स्वातंत्र्यपूर्व काळातच गावात शिक्षणाची गंगा आणली गेली. त्यामुळे शिक्षणाने पुढारलेली, सुसंस्कृत माणसे या गावाचे वैभव आजही टिकवून आहेत. गावात प्रवेश करताच उजव्या बाजूला शाळेचे भव्य प्रवेशद्वार सर्वांचे लक्ष वेधून घेते. शाळेच्या आवारातच उजव्या बाजूला लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी व परसबागेत लावलेली विविध फुलझाडे आकर्षित करतात.

शाळेला मानांकन मिळावे या हेतूने सुरुवातीला आम्ही शिक्षकवृंद कामाला लागलो. हाती पडेल ती कामे पूर्णत्वास नेऊ लागलो. शाळेत भौतिकसोयी सुविधा पूर्ण व्हाव्यात म्हणून स्वतः सर्व शिक्षकांनी सर्वप्रथम स्व-खर्चातून शालेय विकास कामास सुरुवात केली, तसेच शाळा व्यवस्थापन समितीनेसुद्धा सहकार्याची भावना ठेवत सर्वोतोपरी वस्तुरूपाने मदत केली आणि त्यामुळेच आज शाळेला मानांकन मिळाले आहे.

शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शालेय उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे पडता कामा नये या भावनेतून लोकसहभागातून एक प्रकारे प्रोजेक्टर वर्गात बसवून ऑनलाइन अध्यापन करण्यावर जास्त भर देण्यात आला. स्पर्धा परीक्षांच्या या युगात माझ्या शाळेतील मुले यशस्वी व्हावीत, म्हणून स्पर्धा परीक्षा सराव पेपर घेणे, अवांतर वाचनासाठी वेगळा कक्ष तयार करणे अशा प्रकारचे अनेक उपक्रम शाळेत सुरू केले. ज्ञानरचनावादी डिजिटल व आनंददायी पद्धतीने अध्ययन-अध्यापन सुरू केल्यामुळे शाळेतील उपस्थितीचे प्रमाण १००% वाढले.

उपस्थिती टिकवून ठेवण्यासाठी शिक्षक-पालक संघ, माता पालक-शिक्षक संघ, शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य घेऊन गृहभेटी दिल्या जातात. शिक्षण क्रांतिदल हे पथक प्रत्येक विद्यार्थ्याच्या पालकांच्या भेटी घेऊन शैक्षणिक अडचणी समजून घेते. दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत यू-ट्यूब, दीक्षा ॲपचा वापर किंवा विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्स किंवा डाऊनलोड केलेल्या विविध व्हिडिओंच्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन रंजक व आनंददायी बनवण्याचा नियमित प्रयत्न केला जातो.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत सामान्यज्ञान परीक्षा, क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा यांसारख्या स्पर्धांमध्ये शाळेचे अनेक विद्यार्थी सातत्याने उत्तम कार्य करत आहेत. त्याचप्रमाणे शाळेत आम्ही सारे प्रज्ञापती, एक तास वाचनासाठी, इंग्रजी बोलूया काही, मी आजचा स्वच्छ व सुंदर विद्यार्थी, माझे प्रेरणादायी लेखन, चला पाढ्यांच्या आगगाडीत बसूया, शालेय वाचनालय, विद्यार्थी वस्तुभांडार, शालेय बँडपथक, शालेय रोपवाटिका, वॉटरबेल, महत्त्वाच्या व्यक्तींच्या मुलाखती, शिवार भेट, स्वयंशासन, उपस्थिती

ध्वज यांसारखे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम वर्षभर राबवले जातात. वाद्यांच्या तालात शालेय परिपाठ घेतला जातो. शालेय सामूहिक कवायत व संचालनासाठी शाळेत विद्यार्थी ढोलपथक तयार करण्यात आलेले आहे.

आज जिल्ह्यात एक उपक्रमशील शाळा म्हणून प्रसिद्ध असलेल्या माझ्या सावरगाव डुकरे येथील इयत्ता १ली ते ४थी च्या प्राथमिक शाळेतील गुणवत्ता पाहून, तसेच पालकांचा सक्रिय सहभाग व सर्वतोपरी सहकार्य आणि सर्व शिक्षकांची धडपड पाहून सन २०१९ मध्ये शाळेला आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. आसपासच्या तीन ते चार गावांमधून विद्यार्थी याठिकाणी शिक्षण घेण्यासाठी येतात. शाळेचे मुख्याध्यापक श्री. मनोहर जाधव सर यांच्या प्रशासनात आम्ही सर्व शिक्षकवृंद विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करून शाळेचा दर्जा कसा उंचावेल यासाठी प्रयत्न करत आहोत.

शालेय गुणवत्ता विकासासाठी सातत्याने प्रोत्साहन देणारे प्रशासकीय अधिकारी यांचेसुद्धा मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य आम्हाला मिळाले. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक ज्ञानाच्या कक्षा वृद्धिंगत व्हाव्यात म्हणून डाएटचे सर्व विषयतज्ञ शिक्षक हे शाळेला वेळोवेळी भेट देऊन मोलाचे मार्गदर्शन करतात. शाळेला सर्वतोपरी मदत करणारे शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच ग्रामस्थ, पालक यांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत. भविष्यात सावरगाव डुकरे सारख्या ग्रामीण भागातील छोट्याशा खेड्यातील जिल्हा परिषदेची एक नावीन्यपूर्ण उपक्रमशील स्वच्छ सुंदर व आदर्श शाळा म्हणून नक्कीच आपल्या बुलढाणा जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करेल हेच आमचे ध्येय आहे.



**पाण्याची घंटा (Water bell) :**

राज्यातील अनेक शाळा आपल्या आगळ्यावेगळ्या उत्कृष्ट उपक्रमाने ओळखल्या जातात.

यातील अशीच एक ग्रामीण भागातील आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमाची मान्यता मिळालेली सावरगाव डुकरे प्राथमिक शाळा राज्यातील शिक्षकांसाठी प्रेरणास्त्रोत ठरते आहे. शाळकरी मुलींमध्ये यूरीनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनचे प्रमाण वाढत असल्याचे तसेच पाणी कमी प्यायल्यामुळे बालकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम दिसून येत आहेत. पाणी कमी प्यायल्यामुळे प्राथमिक शाळेतील बालकांना पचनसंस्थेचे अनेक विकार जडत आहेत. आरोग्याच्या या समस्येवर उपाय म्हणून सावरगाव डुकरे शाळेत 'पाण्याची घंटा' (Water bell) ही मोहीम सुरू

करण्यात आली आहे. या वॉटर बेलला विद्यार्थ्यांसाठी पाणी पिण्याचा 'वॉटर ब्रेक' पण म्हटले जाते. हा ब्रेक ३० मिनिटांचा आहे. मुलांच्या शरीरात पाण्याची कमतरता (डिहायड्रेशन) हे अनेक आजारांचे प्रमुख कारण आहे. शरीराला आवश्यक तेवढे पाणी न मिळाल्यामुळे मुलांना अनेक प्रकारचे आजार होण्याचा धोका असतो. त्यातही प्रामुख्याने मुलींनी कमी पाणी पिण्याची अनेक कारणे आहेत. एका सर्व्हेनुसार शाळेत स्वच्छ पाण्याची उपलब्धता नसल्याने, तसेच स्वच्छ शौचालयांची कमतरता असल्याने प्रामुख्याने मुली/महिला आवश्यक तेवढे पाणी पीत नाहीत. बऱ्याच पालकांची तक्रार आहे की, घरातून भरून नेलेली पाण्याची बाटली, मुले घरी परत आणतात. पाणी कमी प्यायल्यामुळे मुलांमध्ये डिहायड्रेशन, थकवा येणे, मूत्रमार्गात संसर्ग होणे, मुतखडा (किडनी स्टोन), चिडचिडेपणा आदी त्रास होण्याची शक्यता असते.



शाळेतील मुले अभ्यासाच्या आणि खेळण्याच्या नादात पाणी पिण्याचे विसरून जातात. तेव्हा पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी घंटा वाजविण्याचा प्रकार स्तुत्य आहे. शाळेत तीन वेळा अनुक्रमे प्रथम १०.३५, दुसरी १२ वाजता, तर तिसरी घंटा दुपारी २ वाजता वाजविली जाते. त्याच्याही पुढे जाऊन प्रत्येक ३० मिनिटांनी 'वॉटर बेल' वाजताच वर्गशिक्षकांनी मुलांना पाणी प्यायला सांगणे हा उपक्रम जिल्ह्यात सर्वांत प्रथम सावरगाव डुकरे आंतरराष्ट्रीय (ISO) शाळेत लोकसहभागातून सुरू करण्यात आलेला आहे.

## फुलोरा




इयत्ता पहिली ते चौथीच्या अभ्यासक्रमावर आधारित विद्यार्थ्यांना स्वतः हाताळता यावे तथा स्वयंअध्ययन करता यावे यासाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्याचा आम्ही संकल्प केला. त्यासाठी रेडिमेड कपड्यांसाठी वापरली जाणारी डब्यांची पृष्ठे जमा करून त्याच्या सोयीनुसार पट्ट्या तयार केल्या. विषयानुसार मराठी व इंग्रजी या विषयांमध्ये अक्षरगट,

शब्दगट, वाक्यपट्ट्या, चित्रपट्ट्या, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द, वाक्प्रचार, म्हणी, यमक जुळणारे शब्द आणि गणित विषयामध्ये अंककार्ड, संख्याकार्ड, अंक व संख्यानामे कार्ड, संख्यावरील विविध क्रिया, लहान मोठेपणा, संख्यांचे विस्तारित रूप, स्थानिक किमत, चढता व उतरता क्रम, सम व विषम संख्याचे गट करणे. अशी सर्व माहिती स्व-हस्ते लिहून तयार केलेले साहित्याचे वर्गीकरण करून स्वतंत्र पृष्ठाच्या खोक्यात ठेवले. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत वेळोवेळी सदर साहित्याचा वापर विद्यार्थी करतात. साहित्य स्वतः हाताळता येत असल्याने विद्यार्थी उत्साहाने स्वयंअध्ययन करतात. व गट चर्चेत सहभागी होतात. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासामध्ये वाढ झाली.

### विषयावर बोलू काही

विद्यार्थ्यांच्या भाषण-संभाषण तथा वक्तृत्वशैलीचा विकास व्हावा यासाठी शाळेत आठवड्यातील मंगळवार आणि शुक्रवार रोजी दुपारच्या सत्रात 'विषयावर बोलू काही' हा उपक्रम सुरू करण्यात आला.

यासाठी एक रिकामी पारदर्शक बरणी घेऊन त्यामध्ये विविध चर्चात्मक विषय नोंदवलेल्या चिठ्ठ्या टाकल्या. विद्यार्थ्यांना चिठ्ठी उचलायला सांगून त्यात लिहिलेल्या विषयाबद्दल बोलण्याची संधी दिली. या विषयांना अनुसरून विद्यार्थी आपल्या कल्पकतेने आपले विचार व्यक्त करू लागले. शाळेतील इतरही विद्यार्थी एकमेकांचे अनुकरण करत विविध माहिती संग्रहित करू लागले व या उपक्रमात स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊ लागले. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. ते सहजपणे वेळेवर येणाऱ्या विषयांवर समयसूचकतेने अभिव्यक्त होऊ लागले.

### ताटे ठेवण्याची रॅक



शाळेत दुपारच्या सुट्टीत मुलांना नियमित शालेय पोषण आहार वाटप केला जातो. त्यासाठी शासनाने विद्यार्थी संख्येनुसार ताटे पुरवलेली आहेत; परंतु ताटे सुव्यवस्थित कोठे ठेवावीत हा प्रश्न नेहमी पडायचा. एकावर एक ठेवायची तर पाणी त्यातच राहून ताटांना गंज चढायचा. ताटे ठेवण्यासाठी रॅक बनवायला शाळेकडे तरतूद उपलब्ध नाही, म्हणून गावातील श्री शैनेश्वर संस्थानाचे सचिव श्री. दिनेश पाटील यांनी ही अडचण ओळखून एकूण २०० ताटे बसतील अशी ताटे ठेवण्यासाठी मजबूत लोखंडी रॅक उपलब्ध करून दिली. प्रत्येक विद्यार्थ्याला दिलेला अनुक्रमांक रॅकवर, तसेच ताटावर टाकण्यात आला. मधली सुट्टी होताच मुले आपल्या क्रमांकावर लावलेले ताट काढून स्वच्छ धुऊन घेतात व जेवण झाल्यानंतर ते ताट स्वच्छ धुऊन

आपल्या क्रमांकावर ठेवतात. त्यामुळे प्रत्येक मुलाला दररोज त्याचा क्रमांक असलेले ताट मिळते व त्याची स्वच्छतेची सर्व जबाबदारी नकळत तो सांभाळण्याइतपत सुसंस्कारित होतो. या उपक्रमामुळे मुलांमध्ये स्वतःचे काम स्वतः करण्याची तसेच स्वच्छतेची आवड निर्माण झाली.

### "My English Vocabulary"



विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेची आवड निर्माण व्हावी. मुलांच्या मनातून इंग्रजी विषयाची भीती नाहीशी व्हावी, म्हणून शाळेत हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामध्ये दर दोन दिवसांनी शाळेतील उपक्रम फलकावर इंग्रजी शब्द, वाक्य, उतारा लेखन करून वर्गनिहाय सराव करून घेतला जातो. दोन किंवा त्यापेक्षा जास्त मुलांमध्ये इंग्रजीत संभाषण सरावास सुरुवात करण्यात आली. त्यासाठी सोपे शब्द, सोपी वाक्ये व प्रश्नांचा उपयोग करून विद्यार्थी इंग्रजीत बोलण्याचा प्रयत्न करू लागले. शाळेत हा उपक्रम सुरू करण्यात आला. त्यासाठी इंग्रजी शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्या, तक्ते, चित्र–चित्रशब्दकार्ड, यमक जुळणारे शब्दकार्ड यांसारखे साहित्य विद्यार्थ्यांच्या मदतीने तयार करून घेतले. विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारून संभाषण घडवून आणणे, इंग्रजी शब्दांची अंताक्षरी स्पर्धा घेणे, स्वर व त्यांचा आवाजाचा सराव घेणे, विद्यार्थ्यांना हळूहळू वाचनाची ओढ लावणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्‌देश ठेवून आम्ही शाळेत सुरू केलेल्या उपक्रमामुळे आज बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजी वाचन सफाईदारपणे करत आहेत. पालकांनीसुद्‌धा या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

### नैसर्गिक मातीपासून गणेशमूर्ती तयार करणे

आमच्या गावासह परिसरातही गणेशोत्सवात प्लॅस्टर ऑफ पॅरिस अशा पर्यावरणास हानिकारक मातीपासून तयार केलेल्या मूर्तींची स्थापना केली जायची. यावर पर्याय म्हणून जलप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या विविध प्रकारच्या मातीपासून बनविण्यात येणाऱ्या गणेशमूर्तीला बाजूला सारून सावरगाव डुकरे शाळेतील वर्ग १ली ते ४ थी च्या चिमुकल्यांनी नैसर्गिक मातीपासून स्व हस्ते गणेशमूर्ती बनवावी असे ठरले व मुलांनीही गणेशमूर्ती बनवून, आकर्षक रंग देऊन शाळेत घेऊन आले. मुलांनी बनविलेल्या श्री गणेशमूर्ती शालेय प्रदर्शनीत मांडण्यात आल्या. यावर्षी १० दिवस संपन्न होणाऱ्या गणेशोत्सवात नैसर्गिक मातीच्या गणेशमूर्तींचीच स्थापना प्रत्येक घरी करण्याचा संकल्प केला जातो. प्रतिवर्षी शाळेच्या प्रांगणात आयोजित प्रदर्शनीत अनेक विद्यार्थी उत्साहाने सहभाग घेतात. सदर प्रदर्शनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करण्यात येतो.

या उपक्रमातून विद्यार्थीच, नव्हे तर पालकांनाही खूप काही शिकायला मिळाले. पाण्यात सहज विरघळणारे नैसर्गिक मातीचे गणपती तयार केल्याने पर्यावरण दूषित होणार नाही. तसेच स्वतःच्या हाताने वारंवार सरावाने मूर्ती बनविणे, इतरही वस्तू बनविल्याने मुलांच्या अंगी दडलेल्या सुप्त कला–कौशल्यास वाव मिळाला. विद्यार्थी सुट्टीच्या दिवशी/फावल्या वेळात ओल्या मातीपासून प्राणी, पक्षी, विविध वस्तू, मूर्ती बनविण्याचा प्रयत्न करू लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मिती क्षमता विकसित होऊ लागली. स्वतः तयार केलेल्या मूर्तीची स्थापना घराघरात केल्यामुळे मुलांमध्ये नवचैतन्य व आत्मविश्वास निर्माण झाला.

### खडू मुक्त अध्ययन–अध्यापनयुक्त शाळा

प्रथम वर्गात सिमेंटचे फळे तयार केलेले होते. एक तर त्यावर अक्षर सुवाच्य काढणे शक्य होत नव्हते आणि दुसरी बाब म्हणजे खडबडीत फळ्यावर खडूने लिहिताना खडूचे बारीक कण खाली बसलेल्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत उडायचे. वर्गात स्मार्ट व्हाईट बोर्ड असावेत हा संकल्प करून गावचे सुपुत्र मा. ॲड. जीवन जगन्नाथ पाटील याना आमची समस्या सांगितली. त्यांनी सावरगाव डुकरे आंतरराष्ट्रीय शाळेला ५ वर्गखोल्यांमध्ये ८४ फूट साईजचे व्हाईट स्मार्ट बोर्ड भेट दिले. आज प्रत्येक वर्गात खडूच्या जागी मार्कर पेन आले. आमची शाळा खडूमुक्त झाली. बाहेर गावी नोकरी करत असताना गावाच्या मातीशी जुळलेली नाळ घट्ट धरून ठेवणाऱ्या या सुपुत्राच्या महान पवित्र कार्यास मानाचा मुजरा.

### स्पर्धा परीक्षा पुस्तकोत्सव

मुलांमध्ये सर्वधर्म समभाव वाढीस लागावा म्हणून पूरक विज्ञानवादी बुद्धिवर्धक उपक्रम गणेशोत्सव काळात दहा दिवस साजरा करावा म्हणून शाळेत विविध बौद्धिक स्पर्धा परीक्षांचे आयोजन करून बालकांच्या कलाविष्कारास संधी उपलब्ध करून देण्यात आली. पुस्तकोत्सवात गणपती सोबत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शिकेचे १० दिवस पूजन करण्यात आले.

पारंपरिक गणेशोत्सवात नैसर्गिक मातीपासून विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेली बुद्धीची देवता गणेश मूर्तीची स्थापना करत असतानाच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची ओढ लागावी, बौद्धिक परीक्षेसाठी एक प्रेरणा मिळावी म्हणून सावरगांवच्या आंतरराष्ट्रीय शाळेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शिकेची स्थापना श्री गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी यांचे हस्ते तसेच शाळेचे मुख्याध्यापक मा. मनोहर जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

मुथा फाउंडेशनच्या प्रयत्नाने राज्यात सुरू असलेला 'मूल्यवर्धन' हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या बालमनावर आदर्श संस्कार निर्माण करणारा प्रकल्प सावरगांव डुकरे आंतरराष्ट्रीय शाळेत सातत्याने राबविला जात आहे. त्याचेच उदाहरण म्हणजे पारंपरिक सण उत्सवांसोबतच विद्यार्थ्यांमध्ये देशाची पवित्र संस्कृती जोपासताना बौद्धिक विकासासाठी, तसेच यशस्वी जीवनासाठी स्पर्धा परीक्षाचे किती महत्त्व आहे ही नैतिक मूल्येसुद्धा

प्राथमिक शिक्षणातच बालमनावर बिंबविणे अतिशय महत्त्वाचे आहे आणि ही संकल्पना तथा ही प्रेरणा आम्हांला मिळाली ती मूल्यवर्धन प्रकल्पातून.

मागीलवर्षी आमच्या या उपक्रमाचे राज्यस्तरावर मनभरून कौतुक झाले.

### शालेय मंत्रिमंडळ निवडणूक (२०२२)

विद्यार्थ्यांना लोकशाही पद्धतीने मतदान प्रक्रिया कशी घेतली जाते हे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून सांगायचे तर शालेय मंत्रिमंडळ निवडणूक घेण्याचा संकल्प केला. आणि ही संकल्पना सर्व शिक्षकांना सांगितली. शालेय मंत्रिमंडळ निवडणूक कार्यक्रम लावण्यात आला. त्यामध्ये उमेदवारी अर्ज भरणे, तिकीट वाटप करणे, निवडणूक प्रचार करणे, मतदान दिवस ठरवून मतदान अधिकारी चमू तयार करून पारदर्शक व लोकशाही पद्धतीने प्रत्यक्ष मतदान घेणे दुसऱ्या दिवशी शिस्तबद्ध मतमोजणी करणे, तसेच निकाल घोषित करणे या सर्व बाबी लक्षात याव्यात यासाठी या वेळी शाळेमध्ये अगदी खऱ्याखुऱ्या मतदान केंद्राचा सेट-अप करण्यात आला होता. मतदान अधिकारी क्र.१ चि. रुद्राक्ष गायकवाड, मतदान अधिकारी क्र. २ चि. प्रथमेश डुकरे, मतदान अधिकारी क्र. ३ चि. प्रीती डुकरे या इयत्ता ४ थी च्या मुलांनी मतदान प्रक्रिया भूमिका चोखपणे पार पाडली. पोलीस शिपाई म्हणून अतिशय चोख बंदोबस्त सांभाळत चि. हर्षित चांडक याने काम पाहिले. निवडणूक निरीक्षण अधिकारी तथा केंद्राध्यक्ष चि. सम्यक जाधव याने प्रक्रियेवर बारीक लक्ष ठेवले. एका मतदाराचे नाव मतदार यादीत (हजेरी पुस्तिकेत) नसल्याने त्याला मतदान करता न आल्याने त्याचा हिरमोड झाला. सायंकाळी ५ वाजता मतदान संपले. मग सर्वांना उत्सुकता होती ती मतमोजणीची. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता मतमोजणी सुरू झाली. तेव्हा उमेदवारांचे प्रतिनिधी मतमोजणीला हजर होते. एकूण झालेल्या मतदानात एकही मत अवैध न ठरल्याने ११६ मतांची मोजणी करण्यात आली. त्यामध्ये चि. मल्हारी पाटील (२८ मते), कु. नेहा नेमाने (२५ मते), कु. बुद्धप्रिया गवई (१२ मते), कु. योगिता जाधव (१२ मते), चि. शिवराज लोखंडे (२० मते), चि. वेद पाटील (१६ मते) मिळाली.

अखेर सर्वांत जास्त मते घेऊन, प्रधानमंत्री पदाची खुर्ची इयत्ता ४ थी चा विद्यार्थी चि. मल्हारी पाटील याने मिळवली. उप प्रधानमंत्री म्हणून ४ थी ची विद्यार्थीनी कु. नेहा नेमानेही २५ मते घेऊन दुसऱ्या क्रमांकावर राहिली, तर काही उमेदवार आपले डिपॉझिटही वाचवू शकले नाहीत. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निवडणूक तथा मतदान प्रक्रिया कशी असते हे प्रत्यक्ष कृतीतून समजले. यामध्ये समय सूचकता, आत्मविश्वास, नेतृत्व, बंधुभाव, समानता, शिस्त, वक्तृत्व, सहकार्याची भावना, एकता यांसारखी मूल्ये विद्यार्थ्यांच्या अंगी रुजविली गेली.

### चप्पल स्टँड

ज्याच्याकडे दोन हात आहे त्याने थोडे काम द्यावे
ज्याच्याकडे मधुर कंठ आहे त्याने दोन गाणी द्यावी
ज्याच्याकडे निर्मळ दातृत्व आहे त्याने थोडे दान द्यावे.

अगोदर सावरगांव डुकरे प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आपले बूट व चपला वर्गाच्या बाहेर ठेवायचे. परंतु सर्व विद्यार्थ्यांच्या चपला–बूट व्हरांड्यात अस्ताव्यस्त पडलेल्या असायच्या. विद्यार्थ्यांना आपल्या चपला, बूट एका नियोजित ठिकाणी शिस्तबद्ध पद्धतीने सुव्यवस्थित ठेवता यावेत म्हणून १५० ते २०० मुलांच्या चपला व बूट बसतील असे ‘चप्पल स्टँड’ शाळेसाठी तयार करण्याची संकल्पना आम्ही शाळा व्यवस्थापन समितीकडे व्यक्त केल्यानंतर सावरगांवचे सुपुत्र मा. ज्ञानेश्वर पाटील यांनी आपल्या आईचा वर्षश्राद्ध कार्यक्रम रद्द करून या उपक्रमासाठी रु. ११,०००/– शाळेला दिले. त्या रकमेतून शाळेत ‘चप्पल स्टँड’ या संकल्पित उपक्रमाचे आमचे स्वप्न आज पूर्णत्वास गेले. आज शाळेतील २०० विद्यार्थ्यांना चप्पल/बूट ठेवता येतील अशा रु. १८,५०० किमतीच्या लोखंडी मजबूत रॅक्स तयार करण्यात आल्या आहेत. यासाठी शाळेला मदत करणाऱ्या मान्यवर दातृत्वास सलाम !

### उपक्रमाचे फलित

विद्यार्थ्यांना मिळालेला नंबर रॅकवर टाकलेला असल्याने आपली चप्पल–बूट आपल्याच नंबरवर ठेवण्यासाठी मुलांना दररोज नंबर शोधावे लागतील. त्यामुळे संख्याज्ञान दृढ होण्यास मदत होईल. स्वयंशिस्त, नियोजन, वक्तशीरपणा, स्वच्छता, सुव्यवस्थितपणा, समता, बंधुता, स्त्रीपुरुष समानता, सर्वधर्म समभाव या संस्कारक्षम मूल्यांची रुजवणूक सहजतेने विद्यार्थ्यांमध्ये रुजविता येईल.

### होळी उत्सव (२०२२)

**उद्देश : छोटे जीव, शेती, वने व जलसंस्था वाचवण्यासाठी तणहोळी साजरी करणे.**

होळी म्हटले की, दुष्प्रवृत्तीचे, वाईट गोष्टींचे दहन. होळीला उपयोगी व देशी झाडांची तोड करू नये. याच अनुषंगाने निसर्ग, पर्यावरण, शेती, मानवी व वन्यजीव यांवर अतिक्रमण करू लागलेल्या अनेक विदेशी उपद्रवी, विषारी तणे, वृक्ष, लष्करी अळी, कीटक यांचे समूळ उच्चाटण करणे. भारतीय वनस्पती, शेती व परिसंस्था वाचविणे व वृद्धिंगत करणे हा या हरित चळवळीचा मुख्य उद्देश्य आहे. घाणेरी (टणटणी), गाजर गवत, रानमारी, टेकोमा, पिवळा धोत्रा, कॉसमॉस, सुबाभुळ, ऑस्ट्रेलियन बाभुळ, जलपर्णी, जलकुंभी, बेशर्मी आदि विदेशी, विनाशकारी वनस्पती असून, अमेरिकन लष्करी अळी हा विदेशी कीटक आहे. घाणेरी व गाजर गवत यांनी देशातील करोडो एकर क्षेत्र व्यापले आहे व त्याचे मूल्य आकड्यात करता येणे अशक्य आहे. कुठेही जा आपणास फक्त घाणेरी आणि गाजर गवतच दिसेल. परदेशी व उपद्रवी तणे व वृक्ष वन व जल परिसंस्था यांचा समतोल बिघडवतात, स्थानिक उपयुक्त वनस्पती नष्ट करतात. या मुळे पिकांचे उत्पादनही घटते. या तणांमुळे किडीचा व रोगांचाही प्रादुर्भाव होतो. जलपर्णी, जलकुंभी, बेशर्मी यांमुळे



जल दूषित होते, डासांची खूप वाढ होते व अनेक आजार पसरतात. यासाठी शेतकरी, निसर्गप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण क्षेत्रात कार्य करणारे यांनी या होळीला सर्व विदेशी तणे उपटून त्यांची 'तणहोळी' करावी.

गाजर गवत हे ही मुळचे अमेरिकेतील. ७२ च्या दुष्काळावेळी अमेरिकेने भारताला मदत म्हणून जो–मिलो जातीचा गहू पाठवला होता त्यासोबत गाजर गवताचे 'बी' देशात आले. काही गहू खाण्यासाठी वापरला गेला, तर काही लागवडीसाठी. गाजर गवताचे विषारी बी अशा प्रकारे या मातीत पडले व देशातील प्रत्येक भाग त्याने आज व्यापला आहे. गाजर गवताच्या ऍलर्जी ने २ कोटी भारतीय दमा, सततची सर्दी, त्वचारोग याने त्रस्त आहेत व त्याच्या उपचारार्थ लोक दरवर्षी ४ ते ६ हजार कोटी रुपये खर्च करतात. या उपद्रवी तण व परदेशी झाडांची होळी गावोगावी या निमित्ताने होणे गरजेचे आहे. शेतीचे अब्जावधी रुपये नुकसान ही तणे व कीडी करत आहे. आज या अभिनव होळी महोत्सवात सावरगाव डुकरे येथील सर्व शिक्षक व विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले. व समाजासमोर या चिमुकल्यांनी एक आदर्श निर्माण केला.

## इंग्रजी विषयाची कार्यशाळा

इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची भीती वाटू नये, तसेच इंग्रजी भाषेत संभाषण करणे सोपे जावे यासाठी सावरगाव डुकरे आदर्श शाळेत नियमितपणे इंग्रजी विषय कार्यशाळा आयोजित करण्यात येते. याही वर्षी इंग्रजी विषयात पी.एचडी प्राप्त केलेले डॉ. वडाळकर सर यांना तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून आमंत्रित केले होते. मा. वडाळकर सरांसोबत इंग्रजीत चर्चा करताना विद्यार्थी, व्यवस्थापन समिती पदाधिकारी तथा शिक्षकवृंद अगदी आनंदाने सहभागी झाले होते. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत इंग्रजी विषय संभाषण कार्यशाळा आयोजित करणे या उपक्रमाचे समस्त गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

मा. डॉ. वडाळकर सरांनी कार्यशाळेदरम्यान सोपे सोपे आपल्या दैनंदिन वापरत असलेले शब्द तसेच त्या शब्दांचा उपयोग करून बिनधास्तपणे तयार होणारी वाक्ये याबाबत हसतखेळत व आनंददायी पद्धतीने मार्गदर्शन केले. कार्यशाळेदरम्यान अनेक विद्यार्थ्यांनी वाक्यांचे वापर सहजतेने करून दाखवले. यावेळी गावातील उच्च शिक्षित श्री. समाधान पाटील यांनीसुद्धा विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

## IMO स्पर्धा परीक्षा (२०२०)

दि. १७ डिसेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या International Mathamatics Olympiad स्पर्धा परीक्षेत आंतरराष्ट्रीय शाळा सावरगावचे इयत्ता २ री चे चार विद्यार्थी International Rank 8 मध्ये विशेष प्रावीण्य मिळवून उत्तीर्ण. त्यांना मिळणार 1000 + Gold Medal of Distinction + Certificate of Distinction + Certificate of Zonal Excellence यामध्ये (१) नैतिक संतोष सोनुने (२) आयुष जीवन जाधव (३) सोहम विलास पाटील (४) कु. आश्लेषा अनिल गोरे

Zonal Rank 17 मध्ये इयत्ता २ री चे तीन विद्यार्थी यशस्वी (१) प्रथमेश गणेश डुकरे (२) श्रेया श्रीधर

पाटील (३) समर्थ प्रवीण निर्मळ यांना मिळणार Certificate of Zonal Excellence + Medal of Distiction + Certificate of Distinction Award.

इयत्ता ३ री चे ५ विद्यार्थी + गोल्ड मेडल + लेव्हल २ साठी पात्र. (१) कु. अपूर्वा विठ्ठल जाधव ३ री. (२) समर्थ देविदास डुकरे ३ री. (३) ईश्वर शेनफड सपकाळ ३ री. (४) प्रफुल्ल राजेश सोनुने ३ री. (५) आदित्य संतोष डुकरे ३ री.

गोल्ड मेडल : अनुज शिवानंद पाटील २ री,

ब्रांझ मेडल : युवराज शरद पाटील २ री, शंतनू दिगंबर पंडित ३ री, कु. श्रेया प्रताप पाटील ४ थी,

सिल्व्हर मेडल : शर्वरी समाधान पाटील २ री, कु. गायत्री दीपक डुकरे ३ री

इयत्ता ४ थी चे २ विद्यार्थी गोल्ड मेडल (लेव्हल-२) साठी पात्र (१) कु. अक्षरा अमर व्यवहारे २) कु. भाविका संतोष डुकरे

प्राथमिक स्तरावर मुलांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती व्हावी, परीक्षेची आवड निर्माण व्हावी तसेच मुलांना अवांतर वाचनाची सवय लागावी म्हणून सहभागी होऊन यशस्वी होणाऱ्या सर्व विध्यार्थ्यांचे, पालकांचे तसेच त्यांच्या यशासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व वर्ग शिक्षकांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!

### आपली शाळा - स्वच्छ व सुंदर शाळा

सदर उपक्रम बघून कळेलच आपल्याला की, आपली सावरगावची जिल्हा परिषदेची शाळा नेहमीच स्वच्छ व सुंदर का दिसतेस ते! त्याचं मुख्य कारण आहे ते येथील शालेय मंत्रिमंडळातील दर १५ दिवसांनी होणाऱ्या आढावा सभेत प्राधान्याने घेतल्या जाणाऱ्या स्वच्छतेबाबतच्या नवनवीन उपक्रमांवर चर्चा करणे व ती साक्षात उतरविणे. प्राथमिक स्तराचा विचार करता शाळा लहान, मुलेही लहान; पण शिस्त असेल तर काहीही अशक्य नाहीच. येथील मंत्रीमंडळाने एक निर्णय घेतला तर तो अमलात आणलाच जातो. मागील एका सभेत ठरल्याप्रमाणे दररोज एका वर्गातील विद्यार्थ्यांनी परिपाठापूर्वी आपल्या शाळेचा परिसर स्वतः स्वच्छ करायचा. तेव्हापासून दररोज एका वर्गातील विद्यार्थी जवळपास शिक्षक नसले तरी ग्रुपवर क्षेत्र वाटून शालेय परिसराची स्वच्छता करतात. यात त्यांच्या सुशिक्षित व सुसंस्कृत पालकांचेही सहकार्य नेहमीच मिळते.कारण येथील पालकांना आपली मुले शाळेत काम करतात याचा अपमान नाही तर अभिमानच वाटतो. इतक्या लहान वयात कोठून आली ही समज? कोठून मिळाली ही प्रेरणा? ही शिस्त अंगात भिनली ती उपक्रमशील गुरुवर्यांच्या संकल्पनेतून अन मूल्यवर्धन या प्रकल्पातून.

आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करणाऱ्या या इवल्याशा शाळेतील विविध नावीन्यपूर्ण उपक्रम जवळून पाहताना खरच कोणालाही अभिमान वाटावा असेच आहे. कारण इयत्ता १ ली ते ४ थी च्या वयोगटाचा विचार करता हे उपक्रम चिमुकल्यांच्या बालबुद्धीला आवाहन दिल्यासारखेच वाटावे असे आहे.

चला तर बघूया हा प्रत्यक्ष कृतीतून स्वच्छतेचा संदेश देणारा हा आमच्या शाळेचा स्वच्छतावर्धक उपक्रम.

## चित्रांगण कार्यशाळा आयोजन

सावरगाव डुकरे शाळेत विद्यार्थ्यांना विविध कला–कौशल्य व नवनिर्मितीचा आनंद घेता यावा म्हणून शाळेच्या विद्यार्थ्यांची घेतली चित्रांगण कार्यशाळा.

विद्यार्थ्यांनी रंगीत स्केच पेन, रंगखडूंचा उपयोग करून जमेल तशी चित्रे काढणे, त्यात रंग भरणे, रंगीत कागदाचा उपयोग करून केळी, द्राक्षांचा घड व कापूस, काडेपेटीतील काड्या यांचा उपयोग करून तयार केलेले 'पाऊसधारा' हे चिकटचित्र.



सावरगाव डुकरे शाळेचे विद्यार्थी घेतात विविध प्रात्यक्षिके बनविण्याचा आनंद.

इयत्ता १ ली ते ४ थी चे विद्यार्थी या चित्रांगण कार्यशाळेत उत्साहाने सहभागी झाले. मैदानभर पसरलेले विद्यार्थी, एकमेकांशी एकजुटीने साहित्याची देवाणघेवाण करत असताना, एकमेकांना मदत करण्याची भावना दिसून आली. आपल्याला आपल्या मनाप्रमाणे कृती करण्याचे, चित्र काढण्याचे स्वातंत्र्य मिळाल्यामुळे मुलांमध्ये वाढलेला आत्मविश्वास त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. आता घरी मुळीच राहायचे नाही, गैरहजर राहायचे नाही हा निश्चय अनेक विद्यार्थ्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामुळे केला हे विशेष

## विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी पालक संपर्क :

आमच्या शाळेत सावरगाव, मालगणी, भोगावती या गावांमधून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात. त्यामुळे प्रत्येक पालकांना शाळेत पालक सभेसाठी येणे शक्य होत नाही. त्यासाठी आम्ही पालकांना विश्वासात घेऊन व्हॉट्सअॅप ग्रुपवर चर्चा घडवून आणाली; परंतु तेही शक्य होत नसल्यामुळे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या गावी जाऊन पालक सभा घेणे, विद्यार्थी गुणवत्ता विकासाबाबत चर्चा घडवून आणली.

भोगावती येथे पालकसभेत पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी डायटचे विषयतज्ज्ञ तंत्रस्नेही मा. विकास लोखंडे सरांना विनंती करण्यात आली. त्यांनी अध्ययन–अध्यापनात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल याबाबत पालकांना सांगितले. याच पद्धतीने सावरगांव डुकरे शाळेसारख्या तंत्रज्ञानाचा वापर अध्यापनात करणाऱ्या गुणवत्तापूर्ण शाळेतच आपल्या मुलांना शिक्षण द्या असे समस्त पालकांना मा. लोखंडे सरांनी सांगितले.

या उपक्रमामुळे शिक्षणाप्रति शिक्षकांची तळमळ पालकांच्या लक्षात आली. आपल्या मुलांसाठी धडपडणाऱ्या शिक्षकांवर, तसेच त्यांच्या कार्यावर पालकांचा विश्वास बसला. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत पालकांची भूमिकाही तेवढीच महत्त्वाची आहे. हे पालकांना कळल्यामुळे नव्याने आणखी विद्यार्थी शाळेत दाखल होतील असा विश्वास पालकसभेत पालकांनी व्यक्त केला.

### शिवारभेट तथा अभ्यास दौरा

बंदिस्त शिक्षणापेक्षाही चार भिंतीच्या बाहेर जाऊन प्रत्यक्ष अनुभवातून दिले जाणारे शिक्षण हे विद्यार्थ्यांना चिरकाल स्मरणात राहते याचा प्रत्यय आम्हांला शिवारभेटीदरम्यान आला. शाळेचे सर्व विद्यार्थी व गुरुजी कधी शेताच्या बांधाने, तर कधी वाघापूर पांधन रस्त्याने पायी चालत प्राचीन मंदिर भगवान सब्बलसिंग महाराज मंदिरात पोहोचले. या शिवारभेटीत रस्त्यात दिसणाऱ्या प्रत्येक अभ्यास वस्तूबाबत विद्यार्थ्यांना विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले.

### अभ्यासदौरा फलित

पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना समजली. आपल्या गाव परिसरातील शेती या मुख्य व्यवसायाचा परिचय झाला. रब्बी हंगाम, खरीप हंगामात घेतली जाणारी पिके कोणती हे कळले.

आता सुरू असणारा हंगाम कोणता? व आज रोजी शेतात घेतली जाणारी पिके यांचा परिचय झाला.

शेतात पाण्याचा योग्य निचरा व्हावा यासाठी शेताभोवती बांध घालणे, नाली खोदकाम करणे, नांगरणे या पारंपरिक पद्धतीची माहिती मिळाली.

पिकाला पाणीपुरवठा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पूर्वीच्या व आधुनिक पद्धतीचा परिचय झाला. रस्त्याने चालताना दिसणारे विविध प्रकारची भक्कम खोड असलेली झाडे, काटेरी झुडपे, झाडांच्या आधाराने वाढणाऱ्या वेली, वार्षिक पिके, अर्धवार्षिक पिके, सपुष्प-अपुष्प वनस्पती, फळे-फुले देणाऱ्या वनस्पती, औषधी वनस्पती, पानांचे विविध प्रकार, फळांची चव, रंग, त्यामध्ये असणारे जीवनसत्त्व याची माहिती मिळाली.

शेती करण्याच्या आधुनिक पद्धती, उदा : फळबाग लागवड, बोअरवेल, ट्रॅक्टरचा वापर, शेडनेट वापर, हळद, फुलबाग लागवड याची माहिती मिळाली. विद्यार्थ्यांना शेतीत पिकणाऱ्या धान्याचे विविध प्रकार समजून सांगितले. शेतीवर आधारित पूरक व्यवसायांचा परिचय करून दिला. जसे - गो-पालन, शेळी, मेंढीपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, कडबाकुटी, सेंद्रिय खत निर्मिती, फळांचे रस तयार करणे, लोणची बनविणे, लघुउद्योग याबद्दल माहिती सांगितली. जीवनात पाण्याचे विविध उपयोग, पाण्याचे नैसर्गिक स्रोत कोणते? याचा परिचय झाला. नदी, ओढा, डोंगर, टेकडी, तलाव, विहीर, बोअरवेल हे प्रत्यक्ष पाहता आले. शेतीची विविध अवजारे वखर, नांगर, कोळपे, कुऱ्हाड, फावडे, टिकास, खुरपे, विळी, कुदळ, तिफण, मळणीयंत्र, फवारणी पंप, बैल, गाडी, ट्रॅक्टर, पाईप, मोटार पंप, याची माहिती मिळाली. ना जातपात, ना भेदाभेद, विविध सुप्त कलादर्शन सादरीकरण करण्यात आले व नंतर एकत्र सामूहिक वनभोजनाचा मनसोक्त आनंद घेता आला.

मंदिराची, देवस्थानाची सविस्तर माहिती तेथील पुजारी किंवा गावातील जाणकार वयोवृद्ध व्यक्तीकडून घेतली. या शिवारफेरी किंवा अभ्यास दौऱ्यामळे विद्यार्थी व गुरुजी यांच्यातील भीती नाहीशी होऊन जवळीकता आणखी घट्ट झाली.

### ''चला पाढ्यांच्या आगगाडीत बसूया!''

मनोरंजनातून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे सहज पाढे पाठांतर व्हावे यासाठी आम्ही 'चला पाढ्यांच्या आगगाडीत बसूया' हा उपक्रम शाळेत सुरू केला. ज्या विद्यार्थ्यांनी १० पर्यंत पाढे पाठांतर केली त्यांच्यासाठी सोमवारी दहाची आगगाडी सुरू केली. अशा प्रकारे २० ची व ३० ची आगगाडी अनुक्रमे गुरुवार व शनिवार यादिवशी परिपाठाच्या वेळी सुरू केली. त्यामुळे आपणास कोणत्या गाडीत बसायचे या उत्साहात विद्यार्थी जिद्दीने पाढे पाठांतर करू लागली. पाहता पाहता इयत्ता पहिलीची मुले १० च्या गाडीत तर इयत्ता दुसरीची मुले २० च्या गाडीत आणि इयत्ता ३ री व ४ थी ची मुले बहुसंख्येने ३० च्या गाडीत दाखल झाली.

या उपक्रमाने संपूर्ण गावात व घराघरात विद्यार्थ्यांमध्ये, तसेच पालकांमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले. विद्यार्थी संख्याज्ञान व संख्येवरील क्रिया सहज करू लागले.

### दहीहंडी महोत्सव - २०२२

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रुजवणूक व्हावी म्हणून शाळेत गोकुळाष्टमी निमित्त दरवर्षी दहीहंडी महोत्सव तथा गोपाळकाला आयोजित केला जातो.

यावेळी विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, टिपरी नृत्य, वेशभूषा स्पर्धेचे आयोजन केले जाते. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र केलेले पोहे, मुरमुरे, दही, साखर यांसारखे पदार्थ दहीहंडी फोडून आनंदाने सेवन केले जातात.

एकीचे प्रदर्शन, मैत्रिभाव, समानता, बंधुता, सहकार्य, समयसूचकता, कल्पकता, सृजनशीलता, सर्वधर्म समभाव, स्त्री-पुरुष समानता यांसारखी राष्ट्रीय मूल्ये या उपक्रमामधून बालकांमध्ये रुजविली जातात.

### वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन!

एक विद्यार्थी एक झाड या उपक्रमांतर्गत आम्ही शाळेत विविध वृक्षांची लागवड केली. एक रोपटे शाळेला भेट देऊन प्रत्येक विद्यार्थी आपला वाढदिवस शाळेत साजरा करतो. त्यामुळे शालेय परिसर सुशोभित करण्यासाठी शाळेत अनेक झाडे लावण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वृक्षप्रेम, वृक्षसंवर्धन, वृक्षारोपण याविषयी जाणीव निर्माण झाली. आपल्या जीवनातील वृक्षांचे महत्त्व काय आहे हे त्यांना कळाले. त्यामुळे शाळेतच, नव्हे तर आपल्या अंगणात, शेतातसुद्धा अनेक विद्यार्थ्यांनी झाडे लावली.

### आम्ही सारे प्रज्ञापती

प्राथमिक शाळेतील बालकांना शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा, तसेच विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप व महत्त्व कळावे यासाठी आम्ही शाळेत इयत्ता २री ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी आम्ही सारे प्रज्ञापती हा बौद्धिक अभिनव उपक्रम सुरू केला. यामध्ये प्रत्येक सोमवारी स्पर्धा परीक्षा सराव पेपर दर्शनीय फलकावर लावला जातो. सर्व विद्यार्थ्यांचा शुक्रवार पर्यंत सदर पेपरचा सराव घेण्यात येतो व शनिवारी अतिशय नियोजन व शिस्तबद्ध सराव पेपर घेण्यात येतो. पैकीचे पैकी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे सोमवारी अभिनंदन करण्यात येते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. प्रश्नांची उत्तरे शोधण्याची सवय लागली. सामान्यज्ञानात भर पडू लागली. स्पर्धा परीक्षेची भीती दूर होण्यास मदत झाली. या उपक्रमाचे पालकांनी तसेच जिल्ह्यातील शिक्षकांनी स्वागत केले.

### रांगोळी स्पर्धा !

विद्यार्थ्यांमध्ये लपलेल्या सुप्त गुणांना तसेच त्यांच्यातील सृजनशीलतेला वाव मिळावा यासाठी आमच्या प्राथमिक शाळेत दरवर्षी १४ नोव्हेंबर या बालदिनी रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले जाते. यामध्ये इयत्ता दुसरी ते चौथीचे विद्यार्थी स्वयंमस्फूर्तीने सहभागी होतात व आपल्या कल्पकतेने सुंदर व आकर्षक रांगोळ्या काढतात. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना नवनिर्मितीच्या तसेच हस्त-कौशल्यात्मक गुणांची संधी उपलब्ध करून दिल्या जातात. आपल्या सुप्त गुणांचा शाळेत सन्मान होत असल्यामुळे विद्यार्थी शाळेकडे आकर्षित होतात व सतत गैरहजर राहणारी मुलेसुध्दा शाळेत नियमित येऊ लागतात.

### शालेय रोपवाटिका !

शालेय परिसर सुशोभीत करण्यासाठी शाळेत लावली जाणारी रोपे ही स्वतः शाळेतच तयार करावी यासाठी आम्ही 'शालेय रोपवाटिका' या उपक्रमांतर्गत ३०० पिशव्यांमध्ये काळी माती भरून त्यामध्ये कलम तयार केले. हे कलम शालेय परसबागेत लावण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली तसेच त्या रोपांची योग्य वाढ व्हावी यासाठी घेतलेल्या श्रमामुळे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कसे करावे याची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून तसेच प्रात्यक्षिकातून मिळाली. त्यामुळे आपण स्वतः तयार करून लावलेल्या झाडांची काळजी आपणच घेतली पाहिजे ही सद्भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली.

### विद्यार्थी वाचनालय!

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी, त्यांचा शब्दसंग्रह वाढावा त्याचप्रमाणे त्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी आम्ही विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बालवाचनालय सुरू केले.

इयत्ता २री ते ४थी च्या विद्यार्थ्यांना याचा लाभ देण्यात आला. आठवड्याच्या दर सोमवार व मंगळवारी पुस्तकांची देवाणघेवाण वाचनालय प्रमुख यांच्यामार्फत केली जाते.

या उपक्रमामुळे बालकांना वाचनालय ही संकल्पना माहीत झाली. मुले आवडीनुसार पुस्तके घेऊन वाचन करू लागली. वाचलेल्या गोष्टी व कवितांचे सादरीकरण वर्गात करू लागली. अवांतर वाचनाची आवड व जिद्द निर्माण झाली. शब्दसंग्रह वाढू लागला. पुस्तकांविषयी आदर निर्माण झाला.

### विद्यार्थी वस्तुभांडार

ग्रामीण भागातील पालकांची आर्थिक परिस्थिती शिक्षणांविषयीची अनास्था याचा विचार करून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य माफकदरात वेळीच घेता यावे, तसेच त्यांच्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू नये यासाठी आम्ही शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ विद्यार्थी वस्तुभांडार सुरू केले. विद्यार्थ्यांना लागणारे संपूर्ण शालेय साहित्य वाजवी किमतीमध्ये शाळेतच उपलब्ध केल्यामुळे उत्तमप्रतीचे साहित्य वेळीच मिळू लागले. त्यामुळे पालकांचा त्रास वाचला व आर्थिक बचतसुद्धा होऊ लागली.

या उपक्रमामध्ये विद्यार्थी स्वतः व्यवहार करू लागले. त्यांना व्यवहाराची जाणीव झाली. जवळ असलेल्या पैशांचा योग्य वापर करून मुले शालेय साहित्य खरेदी करू लागली. तसेच व्यवहारात पैशांचे मूल्य काय असते हे मुलांना समजले.

### सहशालेय उपक्रम :

- रक्षाबंधन : बहीण-भावाच्या पवित्र नात्याचे अतुट बंधन.
- सण दिवाळीचा : दिवाळीसाठी विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकाशकंदील.
- वाढदिवसाच्या शुभेच्छा : शालेय स्तरावर साजरे केले जातात विद्यार्थ्यांचे वाढदिवस.
- शालेय गणेशोत्सव - नैसर्गिक मातीपासून गणेशमूर्ती तयार करून पर्यावरणाचे रक्षण करणे.

### सहशालेय उपक्रम

- पुठ्ठा किंवा कागदापासून विविध मुखवटे तयार करणे.
- राष्ट्रीय महापुरुषांची जयंती तथा पुण्यतिथी समारंभ शालेय स्तरावर साजरी करणे.
- स्व-हस्तकलेतून टाकाऊ वस्तूंपासून सुंदर व आकर्षक राखी तयार करणे.
- दिव्यांची आकर्षक मांडणी करून रांगोळी सुशोभित करणे, तसेच अध्यापनात पाठाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवणे.

**सहयोगी खेळ :**

- विविध राष्ट्रीय पुरुषांच्या वेशभूषा साकारणे व त्यांच्या कार्याचा संदेश देणे.
- एकमेकांच्या सहयोगाने हवेत उडविलेला फुगा खाली पडू न देता वरचेवर उडवत ठेवणे.
- एक मनोरंजक खेळ – कमरेवर बांधलेली पाण्याची बाटली व शरीर यांचा समतोल राखत आपला चेंडू ढकलत नियोजित रेषेपलीकडे पोहोचविणे.
- प्रत्येक वर्गाच्या कवितांचे सामूहिक कृतियुक्त गायन करणे.

## शालेय बँड पथक

शाळेत विद्यार्थ्यांची सामूहिक कवायत, राष्ट्रगीत तथा प्रभातफेरीतील संचलन शिस्तबद्धतेने घेण्यासाठी शाळेत बँड पथक हा उपक्रम सुरू करण्यात आला. त्यासाठी लोकसहभागातून बँड साहित्य उपलब्ध करण्यात आले. आता शाळेतील विद्यार्थी बँडच्या ठोक्यावर सामूहिक कवायत, संचलन तसेच राष्ट्रध्वज वंदना उत्कृष्टपणे वाजविण्याचा प्रयत्न करतात.

या उपक्रमामुळे विद्यार्थी दररोज शाळेत वेळेवर येऊ लागले. बँडच्या ठोक्यावर सर्व हालचाली करण्यात त्यांना आनंद मिळू लागला. परिपाठाच्या वेळी शाळेतील वातावरण प्रसन्न व आनंदमय होऊन गेले. विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

**जि. प. केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा**
**सावरगाव डुकरे, पं. स. चिखली, जि. बुलढाणा**

✦✦✦

# कोरोना काळातील उपक्रम

संपूर्ण विश्व कोरोना महामारीच्या विळख्यात सापडले होते आणि सर्व व्यवहार ठप्प झाले होते. असे असतानाही थांबेल तो शिक्षक काय? आलेल्या प्रसंगावर मात करत पुढे जाणे, परिस्थितीला स्वीकारून पर्याय शोधणे आणि मार्गक्रमण करणे हा शिक्षकी स्वभाव याचमुळे आमच्या शाळेतील पंधराजणांच्या टीमने लॉकडाऊनला अडसर न मानता नवीन संधी म्हणून स्वीकारले आणि ऑनलाइनच्या नव्या शैक्षणिक पर्वाला सुरुवात केली.

जेव्हा शक्य तेव्हा ऑनलाइन शिक्षण आणि इतर वेळी ऑफलाइन शिक्षण असे पर्याय स्वीकारले. त्यासाठी अनेक उपक्रमांचे आयोजन केले. जेणेकरून विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहात टिकून राहतील. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री बंगाळे सर यांनी रूपरेषा ठरवून दिली. त्याप्रमाणे प्रत्येकाने आपल्या कल्पकतेचा, तंत्रज्ञानाचा वापर करत नव्या पर्वाला सुरुवात केली. covid-19 चे सर्व सामाजिक नियमांचे काटेकोर पालन करत, बावीस गावच्या विद्यार्थ्यांना सतत शैक्षणिक मार्गदर्शन केले गेले व केले जात आहे. हे मार्गदर्शन अधिकाधिक प्रभावी व आनंददायी व्हावे यासाठी विशेष प्रयत्न केले गेले.

व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करून स्वाध्याय, गृहपाठ, व्हिडिओ तयार करून विद्यार्थ्यांना पाठविले. DikshaApp, ZP live App, Read to me App, hello english App, YouTube अशा विविध अॅप्सचा वापर करून शिक्षण अधिकाधिक प्रभावी बनविले गेले. पालक व विद्यार्थ्यांशी सहसंबंध कायम रहावेत, म्हणून 'शिक्षक आपल्या घरी' हा उपक्रम राबविला गेला. यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री गणेशजी भगत व प्रत्येक गावातील पालक तथा विद्यार्थी यांचे आमूलाग्र सहकार्य मिळाले. याच काळात शाळेतील विद्यार्थ्यांनी शेळके मॅडम यांच्या मार्गदर्शनात अनेक ऑनलाइन स्पर्धांमध्ये भाग घेत यश संपादन केले. वैशिष्टपूर्ण गोष्ट म्हणजे जर्मन, जपानी व कोरियन भाषा शिकण्यात ही विद्यार्थी अग्रेसर आहेत. नवोदय स्कॉलरशिप तसेच आरटीएस परीक्षेची तयारीसुद्धा या काळात मुलांकडून करून घेतली गेली. ही तयारी तिसरीपासून करून घेतली जात आहे.

### व्हॉट्सअॅप ग्रुप :

चिखली तालुक्यातील वरखेड जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा विविध उपक्रम राबवून आपली गुणवत्ता टिकवून आहे. त्यामुळे या शाळेत आजूबाजूच्या जवळपास पंचवीस गावातून विद्यार्थी येतात. नियमित शाळा सुरू असताना पालकांपर्यंत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेला घरचा अभ्यास पोहोचावा यासाठी सत्राच्या सुरुवातीला प्रत्येक वर्गाचे व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आले. तेच ग्रुप आता अशा काळात विद्यार्थ्यांना ज्ञानदानाच्या कामात उपयोगी पडत आहेत. प्रत्येक वर्गाचे वर्गशिक्षक व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहून विद्यार्थ्यांना दररोज घरी अभ्यास देतात. अभ्यास पूर्ण करून विद्यार्थी शिक्षकांना व्हॉट्सअॅप वर फोटो काढून पाठवतात. शिक्षक गरज असल्यास त्या संबंधित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

ऑनलाइन चाचणी तयार करून ती विद्यार्थ्यांना सोडण्यासाठी पाठवतात. विद्यार्थी घरी आपल्या पालकांच्या मोबाइलवर चाचणी सोडवितात. विद्यार्थ्यांना काही अडचण असल्यास तो आपण शिक्षकाला व्हिडिओ कॉल करून ती अडचण सोडून घेतो. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेले दीक्षा ॲप, यू–ट्यूब, बोलो Read along हेदेखील ई–लर्निंगसाठी शिक्षक व विद्यार्थ्यांना उपयोगी ठरत आहे. याप्रकारे शाळा बंद असली, तरी वरखेड आंतरराष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यांची शिक्षण मात्र चालू आहे. ज्या पालकांकडे मोबाइल नाही अशा विद्यार्थ्याला त्याच्या शेजारी राहत असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यास करतो व तो त्या विद्यार्थी देखील शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी वरखेड येथील १५ शिक्षक व मुख्याध्यापक यांनी त्याची खबरदारी घेतली आहे.

शाळेतील इयत्ता पहिली ते आठवी या वर्गाचे १६ ग्रुप कार्यरत असून त्यामध्ये सर्व विद्यार्थी शिक्षण घेत आहेत प्रत्येक वर्गाच्या ग्रुपवर शाळेचे मुख्याध्यापक व व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष त्याचबरोबर केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद यांनादेखील प्रत्येक वर्गाच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर ड करून घेतले आहे. या सर्व अधिकाऱ्यांचे खूप चांगले अभिप्राय मिळत आहेत. या व्यतिरिक्त शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा समिती अध्यक्ष यांचा व्हॉट्सॲप ग्रुप आहे त्यामध्ये कोणत्या वर्गाच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर काय चांगले काम चालू आहे याची चर्चा केली जाते. या व अशा अनेक बाबींची दाखल तरुण भारत या वृत्तपत्राने घेतली होती.

**Online class :**

कोरोन काळात विद्यार्थ्यांना ऑफलाइन शिक्षण देणे अतिशय कठीण झाले होते. त्या संदर्भात शिक्षकांनी अतिशय मेहनत घेऊन विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन क्लाससाठी नियोजन केले होते. विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत होते यासाठी सर्व शिक्षकांनी ऑनलाइन क्लास घेण्याची ठरविले. ऑनलाइन अध्यापनासाठी विद्यार्थ्यांच्या जवळ मोबाइलची सुविधा व इंटरनेटची सुविधा असणे आवश्यक होते. त्यासाठी प्रत्येक गावात जाऊन शिक्षक पालकांना भेटले. विद्यार्थ्यांना भेटले. त्यांच्या मोबाइलमध्ये झूम किंवा गुगल मीट डाऊनलोड करून त्यांना कसे वापरावे याचे मार्गदर्शन केले. ज्या विद्यार्थ्यांजवळ मोबाइल नव्हता त्यांना त्याच्या शेजारील त्याच्या वर्गमित्र किंवा त्याच्या शेजारील विद्यार्थ्याच्या मोबाईलवर क्लास जॉईन करण्यासाठी पालकांना विनंती करून मोबाइल नसणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय केली. अशाप्रकारे प्रत्येक गावातील जवळपास ९० ते ९५ टक्के विद्यार्थी ऑनलाइन क्लासला जोडले होते. सर्व शिक्षकांनी वर्षभर रोज दीड ते दोन तास ऑनलाइन शिक्षण मुलांना दिले. या ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून शाळेचा महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम शिक्षकांनी पूर्ण करून घेतला. याच पद्धतीने



मुलांचे ऑनलाईन चाचणी सोडवणे,स्वाध्याय देणे, स्वाध्याय तपासणे या सर्व गोष्टी व्यवस्थितपणे पार पडल्या. त्याचबरोबर ऑफलाईन म्हणजे गृह भेटीदरम्यानसुद्धा शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### शिक्षक आपल्या घरी :

ऑनलाइन शिक्षण देऊनच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटत नव्हता. त्यासाठी विद्यार्थ्यांना व पालकांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या समस्या सोडवणे हा प्रश्न शिक्षकांसमोर होता. साधारण २२ गावचे विद्यार्थी शाळेमध्ये शिकत असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे शिक्षकांना कठीण होते; पण सर्व शिक्षकांनी प्रयत्नांची पराकाष्टा करत सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे ठरवले. आठवड्याचे वेळापत्रक गावाप्रमाणे तयार केले. रोज प्रत्येक गावात वेळेनुसार व तारखेनुसार जाऊन तेथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष भेटीत त्यांच्या संकल्पना स्पष्ट केल्या. जसे-जसे दिवस जात होते तसे विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये गोडी वाटू लागली होती. प्रत्येक गावात गेल्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये शिक्षणाविषयी व शाळेविषयी आपुलकी वाटू लागली होती.



### स्वाध्याय पुस्तिका :

विद्यार्थ्यांचा अभ्यास सोपा व सहज व्हावा यासाठी शिक्षकांनी स्वाध्याय पुस्तिका तयार केल्या. शाळेत असणाऱ्या झेरॉक्स मशीनद्वारे आतापर्यंत १ लक्ष झेरॉक्स प्रतींचे वाटप विद्यार्थ्यांमध्ये झालेले आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास मागे राहू नये, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी स्वाध्याय पुस्तिकेची निर्मिती शाळेने केली आणि तो स्वाध्याय शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरपोच पोहोचविला. विद्यार्थ्यांच्या हातात सोपा व सहज स्वाध्याय असल्यामुळे विद्यार्थी अगदी आनंदाने तो स्वाध्याय सोडत होती आणि पुढील स्वाध्यायाची वाट पाहत होती. यातच स्वाध्याय उपक्रमाचे यश होते.

### इतर उपक्रम :

- शाळेतील प्रत्येक शिक्षकांनी शासनाने ठरवून दिलेला अभ्यासक्रम ऑनलाइन व ऑफलाइन भेटीद्वारे पूर्ण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्या व्यतिरिक्त
- सामान्यज्ञान स्पर्धेचे ऑनलाइन आयोजन.
- विद्यार्थ्यांना सोप्या वैज्ञानिक प्रयोगाची माहिती देणे व त्यांच्याकडून प्रात्यक्षिकांचा व्हिडिओ मागवणे.
- नवोदय, स्कॉलरशिप परीक्षांच्या तयारीसाठी ऑनलाइन व ऑफलाइन तासिका घेणे.
- विद्यार्थ्यांकडून परीक्षेच्या अनुषंगाने सराव पेपर सोडवणे व मार्गदर्शन करणे.

- इयत्ता तिसरी ते आठवीसाठी RTSE परीक्षेला विद्यार्थी बसून त्याविषयी आठवड्यातून दोन वेळा मार्गदर्शन करणे.
- इयत्तानिहाय मूलभूत संबोध व संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणे.
- इंग्रजी विषयासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे, की ज्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजीची आवड निर्माण होईल, त्यासाठी ऑनलाइन झेरॉक्सच्या साहाय्याने अनेक गृहपाठ विद्यार्थ्यांना देणे.
- शिक्षकांनी स्वतः काही घटकांचे व्हिडिओ तयार करून ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून ज्या विद्यार्थ्यांना अँड्रॉइड मोबाइलची सुविधा नाही त्यांच्यापर्यंत पोहोचून सामाजिक अंतराचे भान ठेवत शक्य तितके मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करणे.
- ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध होऊ शकत नाही, अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.
- माझा आठवड्याचा अभ्यास अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना २०००० झेरॉक्स प्रत्येक आठवड्याला दिल्या व सतत त्याचा मागोवा घेणे.
- सामाजिक अंतराचे भान ठेवत, मास्क व सॅनिटायझरचा वापर करत, वर्षातील जयंत्या व पुण्यतिथी साजरा केल्या, तसेच ऑनलाईन भाषण स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा यांचे आयोजन करणे.
- मागील वर्षी ५ जून या पर्यावरण दिनाच्या निमित्ताने अनेक विद्यार्थ्यांनी कविता लेखन करणे.

**यशस्विता :**

- १४ नोव्हेंबर या बाल दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीमधील पाच विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरावर निवड झाली.
- इयत्ता पाचवी ते आठवी वर्ग सुरू होणार असल्याने आवश्यक ती सर्व शाळापूर्व तयारी सर्वांनी मिळून केली.
- ZP Live Education आयोजित घरात सुरू झाली ऑनलाइन शाळा या राज्यस्तरीय समूहाच्या माध्यमातून पहिली ते इयत्ता पहिली ते आठवीचा संपूर्ण अभ्यासक्रम ऑनलाइन शिकवला गेला.
- ZP Live Education आयोजित घरात सुरू झाली ऑनलाइन शाळा या समूहाच्या माध्यमातून जर्मन व जपानी भाषा शिकवल्या गेल्या त्यातही मुलांनी कार्यशाळेत यशस्वी सहभाग नोंदविला.
- राज्यस्तरीय हस्ताक्षर स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व प्रोत्साहनपर बक्षीस मिळविले.
- ५ जून पर्यावरण दिनानिमित्त वरखेड येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक व पर्यावरण पूरक नाटिका स्वयंस्फूर्तीने सादर केली. तसेच पोस्टर पेंटिंग स्पर्धा सुलेखन स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.
- शाळा बंद शिक्षण सुरू या अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांना नियमित दिल्या गेल्या व स्वाध्याय उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थ्यांकडून सोडविला गेला.

- **सदर सर्व उपक्रमासाठी अविरतपणे झटणारे शिक्षक :**
  - शरद बंगाळे
  - गणेशजी भगत (अध्यक्ष, शा. व्य. स.)
  - राजेश ठेंग
  - विठ्ठल मुरकुटे
  - श्याम सुरूशे
  - रतिराम गायकवाड
  - संजय बावस्कर
  - इंद्रजीत मोरे
  - कैलास पाटील
  - भागवत पाटील
  - उर्मिला शेळके
  - अमोल हाके
  - मंगेश झगरे
  - दिपाली सूर्यवंशी
  - प्रदीप जाधव
  - भागवत सवडतकर
- **सहकार्य व मार्गदर्शन :**
  - मा. श्वेताताई महाले, आमदार, चिखली विधानसभा.
  - मा. भाग्यश्री वीसपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. बुलढाणा.
  - मा. शिक्षणाधिकारी प्राथमिक, बुलढाणा.
  - मा. रामकृष्ण शिंदे, गटशिक्षणाधिकारी, चिखली.
  - मा. पी. टी. सोळंके, केंद्रप्रमुख, मंगरूळ नवघरे.
  - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, बुलढाणा.
  - शाळा व्यवस्थापन समिती, वरखेड.

**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा वरखेड,**
**ता. चिखली, जि. बुलढाणा**

✦✦✦

# शालेय उपक्रमांतून विद्यार्थी अभिव्यक्ती

मेहकर तालुक्यापासून उत्तरेस २२ किमी अंतरावर हे गाव वसलेले आहे. कमलेश्वरच्या प्राचीन मंदिरावरून या गावाला कळंबेश्वर हे नाव प्रचलित झाले. तसेच गावाच्या मधोमध चारही बाजूंनी पायऱ्या असलेली शिवकालीन प्रचंड मोठी विहीर आहे. पूर्वी याच विहिरीचे पाणी संपूर्ण गावाला मिळायचे. गावामध्ये दोन उंच बुरुज असून, पूर्वी पासून या बुरुजांवर लोकांचे वास्तव्य आहे.

गावाच्या दक्षिणेस असलेल्या पेनटाकळी प्रकल्पामुळे बहुतेक शेतीस मुबलक पाण्याची उपलब्धता होते. या गावात जास्तीत-जास्त लोकांचा व्यवसाय शेती असून कृषी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास गावाची ख्याती आहे. गावामधील मुख्य पिके सोयाबीन, तूर, कपाशी, भाजीपाला इत्यादी असून संपूर्ण जिल्हाभर, तसेच शेजारील जिल्ह्यात खायचा काळा ऊस प्रसिद्ध आहे. या शाळेतील यशस्वी शालेय उपक्रमांचे सिंहावलोकन सदर लेखात करत आहोत.

### १) नवागतांचे स्वागत :

शाळा नवीन शैक्षणिक सत्रात सुरू होण्यापूर्वीच शालेय स्वच्छता व सर्व प्रकारची पूर्वतयारी करून ठेवण्यात आली होती. शाळेच्या पाहिल्याच दिवशी सकाळी ९ वाजेपासून स्पीकरवर देशभक्तीपर गीते, शालेय गीते इत्यादींचे वादन करून जनजागृती करण्यात आली. येणाऱ्या प्रत्येक मुलाला फुगे, गुलाब पुष्प देऊन प्रफुल्लित करण्यात आले.

इयत्ता १ ली च्या मुलांना सुंदर सजवलेल्या गाडीत बसवून इतर मुलांसोबत गावात प्रभातफेरी काढण्यात आली. शाळेत आल्यानंतर प्रत्येक मुलाचे औक्षण करून त्यांना गोड खाऊ वाटण्यात आला. त्याचबरोबर पहिल्याच दिवशी नवीन पाठ्यपुस्तके दिल्याने त्यांचा उत्साह द्विगुणित झाला.

### २) उत्कृष्ट शालेय परिपाठ :

अतिशय उत्कृष्ट दर्जाचा परिपाठ इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांकडून सादर केला जातो. सकाळी ठीक १०:२० वाजता विद्यार्थी शाळेमध्ये हजर होतात व बॅग वर्गात ठेवून प्रांगणात येऊन बसतात. १० मिनिटे स्पीकरवर संगीतमय पाढ्यांचा सराव झाल्यानंतर ठीक १०:३० ला राष्ट्रगीतासाठी उभे राहतात.

सोमवार ते बुधवार इयत्ता २ री ते ३ री ची नवीन मुले प्रत्येक आठवड्याला परिपाठ सादर करतात, तर गुरुवार ते शनिवार इयत्ता २ री ते ३ री च्या मुली परिपाठ सादर करतात. परिपाठात क्रमाने स्पीकरवर राष्ट्रगीत, राज्यगीत तर प्रतिज्ञा व संविधान सामूहिक घेतले जाते. त्यानंतर कधी स्पीकरवर, तर कधी सामूहिक प्रार्थना घेतली जाते. विद्यार्थी संचलन करून सुविचार, म्हणी, दिनविशेष, बोधकथा, सामान्यज्ञान, तारखेनुसार पाढे इत्यादी घेतात, तसेच वाढदिवस असणाऱ्या मुलाला/मुलीला पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या जातात आणि पसायदानाने परिपाठाची सांगता होते.

### ३) स्मार्ट ॲण्ड टायडी स्टुडंट

प्रत्येक दिवशी स्वच्छ कपडे, बारीक केस, नखे, टाई, बेल्ट, बूट, सॉक्स इत्यादी बघून रोजचे स्मार्ट गर्ल व स्मार्ट बॉय निवडून ३ टाळ्यांनी त्याचे कौतुक केले जाते. यामुळे विद्यार्थी आवडीने टापटीप, स्वच्छ व आदर्श राहण्याचा प्रयत्न करतात. यामुळे शालेय वातावरणात उत्साही रहाते.

### ४) R. O. च्या पाण्याचा काटकसरीने वापर :

ग्रामपंचायतीच्या सहकार्याने शाळेमध्ये R.O. च्या शुद्ध पाण्याची व्यवस्था केलेली आहे. प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थी रांगेमध्ये जावून पाणी पितात. विद्यार्थ्यांना पाण्याची माहिती सांगितली जाते. पाण्याचे उपयोग काय असतात याची माहिती दिली जाते. पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे. सर्व सजीवांना जिवंत राहण्यासाठी व वाढ होण्यासाठी पाण्याची गरज असते, म्हणून आपण सर्वांनी पाण्याचा काटकसरीने वापर कसा करावा याबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना मिळते.

### ५) चवदार शा.पो.आ. (शालेय पोषण आहार) :

आमच्या शाळेमध्ये २३४ विद्यार्थी असून ते दररोज दुपारच्या सुट्टीमध्ये रोजच्या मेनूप्रमाणे आहार घेतात. शालेय पोषण आहारामध्ये डाळ, हरभरा, मटकी किंवा चवळीची उसळ बनविली जाते, भाजीपाल्याचाही समावेश केला जातो. जेवणाआधी विद्यार्थ्यांसाठी हँडवॉश स्टेशन येथे हात धुण्याची व्यवस्था केलेली आहे. प्रत्येक इयत्तेच्या वर्गाप्रमाणे रांगा करून शालेय पोषण आहाराचे वाटप केले जाते. प्रत्येक विद्यार्थ्याला ताट दिले जाते. विद्यार्थी शालेय पोषण आहार चांगल्याप्रकारे सेवन करतात. दर शनिवारी विद्यार्थ्यांना पूरक आहार म्हणून बिस्किटांचे वाटप केले जाते.

### ६) हँडवाश स्टेशन :

विद्यार्थ्यांना दररोज आरोग्यविषयक माहिती सांगितली जाते. दात, नखे, केस यांबद्दल माहिती परिपाठाच्या वेळी दिली जाते. खेळून आल्यावर हात धुणे, वाढलेली नखे कापणे अशाप्रकारे आरोग्याचे धडे विद्यार्थ्यांना दिले जातात. शौचाहून आल्यावर, खेळून आल्यावर आपले हात साबणाने किंवा हँडवॉशने स्वच्छ धुणे. ग्रामपंचायतीने शाळेला हँडवाश स्टेशन पुरविले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातावर थोडे थोडे हँडवॉश किंवा साबण लावून विद्यार्थी जेवणापूर्वी आपले हात स्वच्छ धुतात. शाळेत मुलांना हात धुण्याची सवय लावण्याची सर्वोत्तम वेळ आहे ती खाऊची मधली सुट्टी ! त्यासाठी एक सोपा खेळ आहे ज्याचे नाव आहे 'कला बिंदू' हा खेळ २१ दिवस खेळला गेला, तर मुलांना साबणाने हात धुण्याची सवय सहज लागते.

### ६) वृक्षारोपण :

वृक्षारोपण म्हणजे झाडाचे रोपटे लावणे. ग्लोबल वॉर्मिंगची पातळी वाढत असल्याने व तापमानातदेखील वाढ होत असल्याने आपल्याला झाडे लावणे व ती जगवणे हे किती महत्त्वाचे झाले आहे हे विद्यार्थ्यांना समजण्यासाठी त्यांना वृक्षारोपणाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या वृक्षांच्या बिया जमवून

त्याचे सीड बॉल्स तयार करून गावाबाहेरील मोकळ्या जंगलामध्ये ते सीड बॉल्स फेकून त्यापासून वृक्ष कसे तयार होतात याचा प्रत्यक्ष अनुभव जि. प. म. प्राथ. शाळा कळंबेश्वर येथील विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

तसेच शाळेतही वृक्षारोपण करून ती झाडे विद्यार्थ्यांना संगोपणासाठी वाटून दिली जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात वृक्षसंवर्धनाची भावना जोपासली जाते. नर्सरीतून रोपे आणून आम्ही ती रोपे विद्यार्थ्यांना वाटून घरी व शेतात लावण्यास देतो. झाड किती वाढले हे बघण्यासाठी झाडासोबत दर महिन्याला फोटो काढून तो विद्यार्थ्यांना जतन करून ठेवण्यास सांगतो.

### ७) महिला मेळावा :

आदर्श जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा कळंबेश्वर येथे दरवर्षी जानेवारी महिन्यात महिला मेळावा आयोजित केला जातो. या मेळाव्यानिमित्त हळदी-कुंकवाचा कार्यक्रम ठेवला जातो. 'शिकलेली आई घराला पुढे नेई' या उक्तीप्रमाणे खरोखर आपल्या पाल्याची काळजी असणाऱ्या सर्वच महिला उत्साहाने या कार्यक्रमात सहभागी होतात.

सर्वप्रथम त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले जाते. त्यानंतर हळदी-कुंकू, संगीत खुर्ची, फुग्यांची स्पर्धा, सुई-दोरा, अशा विविध स्पर्धा घेण्यात येतात. त्यामधून प्रथम, द्वितीय आणि तृतीय नंबर काढून त्यांना बक्षीस दिले जाते व सर्व सहभागी महिलांनासुद्धा योग्य ती भेटवस्तू दिली जाते. कार्यक्रम संपत असताना कार्यक्रमाची सांगता करतेवेळी त्यांच्या पाल्याच्या प्रगतीविषयी वर्गशिक्षक त्यांच्याशी चर्चा करतात. पालक पुढील वर्षी अशाच प्रकारचा कार्यक्रम आयोजित करा असे सांगतात.

### ८) विद्यार्थ्यांचे वाढदिवस

विद्यार्थ्यांसाठी स्वतःचा जन्मदिवस हा एक आनंदाचा क्षण असतो. काही पालक आर्थिक परिस्थितीमुळे घरी वाढदिवस साजरा करू शकत नाहीत. सर्व विद्यार्थ्यांचा वाढदिवस परिपाठाच्या वेळी शाळेत साजरा केला जातो. त्यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या जातात आणि तीन टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले जाते.

### ९) निबंध लेखन स्पर्धा :

आपला देश विविधतेने नटलेला आहे. वेगवेगळ्या परंपरा, काही चांगल्या चालीरीती, सणसमारंभ यांविषयीचे विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढवण्यासाठी वेगवेगळ्या सणांचे निबंध लिहून घेतले जातात. त्यामुळे विद्यार्थी वेगवेगळ्या ठिकाणाहून माहिती मिळवतात, संदर्भ पुस्तकांचे वाचन करतात व निबंध लिहितात.

थोर पुरुषांची जयंती किंवा पुण्यतिथीच्या निमित्ताने सुद्धा थोरांची ओळख व्हावी म्हणून त्यांच्या जीवनावर आधारित निबंध लेखन विद्यार्थ्यांकडून करून घेतले जाते. याची फलश्रुती म्हणजेच विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान मिळवण्याची जिज्ञासा जागृत होते. अक्षर सुधारण्याची चुरस निर्माण होते, सोबतच विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढण्यासही मदत होते.

## १०) वर्ग मंत्रिमंडळ व शालेय मंत्रिमंडळ :

सन २०२३-२४ मध्ये शाळेच्या सुरुवातीला प्रत्येक वर्गाची निवडणूक घेऊन जुलै महिन्यासाठीचे वर्ग मंत्रिमंडळ तयार केले जाते.

या उपक्रमांतर्गत गुप्त मतदान पद्धतीने प्रत्येक वर्गाचे एकूण सहा वर्ग मंत्री निवडले जातात. यामध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अभ्यासमंत्री, आरोग्यमंत्री, स्वच्छतामंत्री, क्रीडामंत्री इत्यादींचा समावेश असतो. निवड झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना त्यांचे पद व दिलेली जबाबदारी अशा पद्धतीचा एक फलक वर्गामध्ये लावला जातो. त्यामुळे ती विद्यार्थी उत्साहाने संपूर्ण महिनाभर आपली जबाबदारी पार पाडतात. निवडून झाल्यानंतर त्यांना त्यांच्या कामाची जबाबदारी समजावून सांगितली जाते. या अगोदर मंत्री झालेला कोणताही विद्यार्थी परत निवडणुकीला उभा राहू शकणार नाही असा नियम बनवला आहे, म्हणजेच प्रत्येक महिन्याला नवीन मंत्रिमंडळ स्थापन होतेच आणि सर्व विद्यार्थ्यांना नेतृत्वाची संधी मिळते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा, नेतृत्व गुण इत्यादी वाढीस लागतात त्यांना शाळेविषयी आवड निर्माण होते.

अशाच प्रकारे प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची वर्गशिक्षकांच्या मदतीने शालेय मंत्रिमंडळावर प्रत्येक महिन्याला निवड करून शालेय मंत्रिमंडळसुद्धा स्थापन केले जाते.

## ११) उपक्रमांचा शनिवार :

या उपक्रमांतर्गत प्रत्येक शनिवारी वेगवेगळे उपक्रम शाळेत राबवले जातात, त्यामुळे प्रत्येक शनिवारी विद्यार्थी एक नवीन आशा घेऊन शाळेमध्ये उपस्थित होतात. या कार्यक्रमांतर्गत खालीलप्रमाणे कार्यक्रम घेतले जातात.

अ) **शुद्धलेखन स्पर्धा :** या उपक्रमांतर्गत एखाद्या शनिवारी मराठी व एखाद्या शनिवारी इंग्रजीचे शुद्धलेखन लिहून घेतले जाते. इयत्ता १ ली ते ४ थी चे विद्यार्थी त्यांना आवडणाऱ्या पाठाचे वीस ओळी शुद्धलेखन आवडीने लिहितात. प्रत्येक वर्गातून पाच क्रमांक काढले जाऊन पुढील शनिवारी त्यांचे अभिनंदन करून त्यांना बक्षीसही दिले जाते.

ब) **इंग्रजी शब्दलेखन स्पर्धा :** शनिवारी सकाळी विद्यार्थ्यांना त्यांना येणाऱ्या जास्तीत जास्त इंग्रजी शब्दलेखन करण्यास प्रवृत्त केले जाते. जो विद्यार्थी स्पेलिंग सह जास्तीत जास्त इंग्रजी शब्दलेखन करेल त्याला बक्षीसही दिले जाते. यामुळे विद्यार्थी जास्तीत जास्त शब्द पाठांतर करतात.

क) **आदर्श कवायत :** या उपक्रमांतर्गत शनिवारी सकाळी परिपाठ झाल्याबरोबर कवायत घेतली जाते विद्यार्थी अगदी शिस्तीत कवायत करतात व त्यामुळे शाळेतही वेळेवर उपस्थित होतात.

ड) **इंग्रजी शब्दांच्या भेंड्या :** महिन्यातील एखाद्या शनिवारी इंग्रजी शब्दांच्या शेवटच्या अक्षरावरून नवीन शब्द सांगणे अशा मुली विरुद्ध मुले इंग्रजी शब्दांच्या भेंड्या खेळता खेळता इंग्रजी शब्दांचे दृढीकरण होते व तसेच मुलांना इंग्रजी शब्द पाठांतराची आवड निर्माण होते.

इ) **पाढे लेखन :** पाढे पाठांतराशिवाय गणित विषय समजणे शक्य नाही. त्यामुळे पाढ्यांचे आवडीने पाठांतर व्हावे यासाठी जास्तीत जास्त पाढे लेखन हा उपक्रम राबवला जातो व यामध्ये प्रत्येक वर्गातून एक ते तीन नंबर काढून त्यांना पेन–पेन्सिल, वही अशा वस्तू बक्षीस दिल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पाढे पाठांतराची चुरस निर्माण होते.

### १२) सांस्कृतिक कार्यक्रम :

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे फार गरजेचे आहे. तसेच त्यांच्यामध्ये असलेल्या कलागुणांना वाव जर मिळाला, तर त्यामधूनच त्यांचा सभाधीटपणा वाढीस लागून त्यामधून मोठमोठ्या कलाकारांचा जन्म होतो. जानेवारी महिन्यात प्रत्येक वर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन केले जाते. प्रत्येक वर्गातील मुले खूप आनंदाने त्यामध्ये सहभागी होतात. या अंतर्गत वेशभूषा करून देशभक्तीपर गीते, नाटिका, डान्स इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कार्यक्रमासाठी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होतात व आपल्या चिमुकल्यांचा कलागुणांची प्रचीती त्यांना येते व असलेल्या उपजत गुणांविषयी माहिती मिळते. गावकरी मोठ्या आनंदाने बक्षीसस्वरूपी कौतुकाची थाप आपल्या चिमुकल्यांच्या पाठीवर टाकतात.

### १३) मंथन स्पर्धा परीक्षा :

वर्ग १ली ते ४थी चे एकूण ४२ विद्यार्थी मंथन या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेमध्ये प्रविष्ट केले होते. अतिरिक्त वर्ग घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. शालेय स्तरावर शिस्तप्रिय वातावरणात मंथन स्पर्धा परीक्षेचे प्रत्येक शनिवारी एक असे १० सराव पेपर घेण्यात आले. त्या नंतर प्रश्नपत्रिकेतील शंका निरसन करून देण्यात आले. एक विद्यार्थी राज्य स्तरावर व इयत्ता तिसरीची एक विद्यार्थिनी जिल्हा स्तरावर झळकली.

### १४) बाल आनंद मेळावा :

विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान व्हावे व स्वनिर्मितीचा आनंद मिळावा या उदात्त हेतूने बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात येते.

आजचा विद्यार्थी उद्याच्या भारतमातेचा सुजाण नागरिक होणार आहे. म्हणूनच साक्षरतेसोबतच उच्च दर्जाचे संस्कार व भारतीय संस्कृतीविषयी अभिमान निर्माण होणे गरजेचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून येणे काळाची गरज आहे.

शिक्षण मानवाला कसे जगावे हे शिकवते म्हणूनच उच्च दर्जाचे प्राथमिक शिक्षण जीवन समृद्ध बनवते. याच हेतूने प्रेरित होऊन जि. प. म. प्राथ. शाळा, कळंबेश्वर येथे शिक्षणसोबतच विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्या मधून विद्यार्थ्यांमधील कल्पकता, सभाधीटपणा, नेतृत्व, शोधकवृत्ती अशा सुप्त गुणांना वाव मिळतो व शिक्षणप्रक्रिया आनंददायी होते.

**जि. प. प्राथ. शाळा कळंबेश्वर,**
**ता. मेहकर, जि. बुलढाणा.**

✦✦✦

# शिष्यवृत्तीचा जरगनगर पॅटर्न

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या करवीर नगरीत सर्वप्रथम शाहूंच्याच आशीर्वादाने शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा कायदा झाला. त्यांचा वसा आणि वारसा पुढे चालवत प्राथमिक शिक्षण समिती, कोल्हापूर महानगरपालिका 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य घेऊन गोरगरीब मुलांना गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व मोफत शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने अनेक शाळा यशस्वीपणे चालवत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या वाढत्या पटसंख्येने व शिष्यवृत्तीच्या 'जरगनगर पॅटर्न' ने प्रकाशझोतात आलेली शाळा म्हणजे ***'मनपा – श्रीमती लक्ष्मीबाई कृष्णाजी जरग विद्यामंदिर, जरगनगर, कोल्हापूर'*** होय. ११ एप्रिल, १९९४ रोजी स्थापन झालेल्या लक्ष्मीबाई कृष्णाजी जरग विद्यामंदिर या शाळेत आज पहिली ते सातवीमध्ये एकूण २,३०० इतक्या विक्रमी संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेची मुख्य इमारत तीन मजली असून अन्य स्वतंत्र दोन दुमजली इमारतींमध्ये मिळून एकूण ३९ खोल्यांमध्ये सकाळ व दुपार दोन्ही सत्रांमध्ये शाळेचे वर्ग भरतात. एवढ्या प्रचंड प्रमाणात एका शासकीय शाळेवर पालकांचा विश्वास असण्याचे एकमेव कारण म्हणजे येथील शिष्यवृत्तीचा जरगनगर पॅटर्न होय.

१३ जुलै, २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल लागला. १६ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत व ४८ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत असे एकूण ६४ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले. एकाच शाळेचे एकाच वेळी एवढ्या प्रचंड संख्येने विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा हा महाराष्ट्रातील विक्रम ठरला आहे.

शाळेत इयत्ता पहिलीपासूनच केटीएस (कोल्हापूर प्रज्ञाशोध परीक्षा) तसेच इतर विविध बाह्य परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची विशेष तयारी करून घेतली जाते. त्यासाठी येथील शिक्षक शाळेच्या वेळेव्यतिरिक्त ज्यादा वेळ देतात. त्याचाच परिपाक म्हणून शाळेत प्रवेशासाठी मध्यरात्रीपासूनच रांगा लागलेल्या दिसतात. याच शाळेत प्रवेश मिळावा यासाठी पालक आग्रही असतात. आज संपूर्ण महाराष्ट्रात शिष्यवृत्तीचा जरगनगर पॅटर्न प्रसिद्ध झाला आहे. कोणत्याही गोष्टीत यश मिळवायचे असेल, तर ती गोष्ट निरस न वाटता रंजक व आनंददायी वाटायला हवी. मुलांना सातत्याने सकाळी १० ते ६ या वेळेत अभ्यासात गुंतून ठेवायचे असेल, तर अध्यापन पद्धतीत नावीन्य हवे. मुलांमधील आंतरिक उर्मी जागृत करायला हवी. या सर्व गोष्टी येथे विशेष कौशल्याने घेतल्या जातात.

### जरगनगर पॅटर्न

१) **निवड परीक्षा :** श्रीमती लक्ष्मीबाई कृष्णाजी जरग विद्यामंदिरचा वर्धापन दिन ११ एप्रिल या दिवशी असतो. त्याच दिवशी चौथीच्या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमावर आधारित बहुपर्यायी प्रज्ञाशोध परीक्षा घेतली जाते. साधारणपणे सहा तुकड्यांमधील साडेतीनशे विद्यार्थ्यांमधून शंभर मुलांची गुणानुक्रमे निवड केली जाते. हे विद्यार्थी पाचवी शिष्यवृत्तीसाठी निवडले जातात.

२) **पालक प्रबोधन :** विद्यार्थ्यांची निवड झाल्यानंतर पालकसभा घेऊन शिष्यवृत्तीचे वर्षभराचे नियोजन सादर केले जाते. कोणतीही सुट्टी, वेळेची सवलत दिली जाणार नाही. आपण सर्वांनी मिळून हे शिवधनुष्य पेलायचे आहे, याची हमी पालकांना देऊन त्यांचे सहकार्य मिळवले जाते.

३) **शिष्यवृत्ती वर्गाची वेळ :** सकाळी १० ते ५ ही शाळेची वेळ असली तरी टप्प्याटप्प्याने ती शिष्यवृत्ती वर्गासाठी १० ते ६ नंतर ९ ते ६ अशी वाढवली जाते. वर्षभरात दिवाळीचे पाच व मे महिन्याचे १० दिवस सोडले, तर कोणतीही सुट्टी दिली जात नाही. चौथीची परीक्षा संपताक्षणी शिष्यवृत्तीचे वर्ग अखंडितपणे वर्षभर सुरू असतात.

४) **शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षक टीम :** शिष्यवृत्ती परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी इयत्ता पाचवीची विषयवार शिक्षक टीम मार्गदर्शन करते. मराठी, इंग्रजी, गणित, बुद्धिमत्ता या विषयांसाठी स्वतंत्र शिक्षक मार्गदर्शन करून ताकदीने आपल्या विषयाची जबाबदारी पेलतात.

५) **३०० प्रश्नपत्रिकांचा सराव :** साधारणपणे ऑक्टोबरपर्यंत परीक्षेचा अभ्यासक्रम संपवून मुलांचा वेगवेगळ्या प्रश्नपत्रिकांचा सराव सुरू होतो. अनेक नामांकित प्रश्नपत्रिका संच, शिक्षकांनी स्वतः काढलेल्या प्रश्नपत्रिका, तसेच विविध तालुक्यांत घेण्यात येणारे सराव पेपर सोडवून घेतले जातात. प्रत्येकी १५० अशा एकूण ३०० प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्याने मुलांचा भरपूर सराव होतो. सराव हाच या शाळेच्या यशाचा मूलमंत्र आहे.

६) **रंजक पद्धतीने पाठांतर :** वेगवेगळ्या सोप्या ट्रिक्स, नाट्यीकरण, कविता गायन यांद्वारे विद्यार्थ्यांना पाठांतराचे आनंददायी व रंजक धडे दिले जातात. विद्यार्थीच वेगवेगळ्या पद्धतीने पाठांतराच्या सोप्या ट्रिक्स बनवतात. विविध ॲप्स, व्हिडिओज, ऑनलाइन टेस्ट यांचाही अध्यापनात वापर केला जातो.

७) **प्रेरक छत्रपती राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती :** कोल्हापूर महानगरपालिका आपल्या अधिनस्त असलेल्या मनपा शाळांसाठी तीन सराव परीक्षा आयोजित करते. यातील अंतिम परीक्षेत प्रथम येणाऱ्या पहिल्या २५ मुलांना गुणानुक्रमे पुढील दोन वर्षांकरिता २४०० रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते. ही राजर्षी छत्रपती शाहू शिष्यवृत्ती योजना मनपाच्या तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी मोठी संजिवनी ठरत आहे. आतापर्यंत शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेचे साधारणपणे साडेचारशे विद्यार्थी चमकले असून दरवर्षीचा आलेख चढताच राहिला आहे.


**पुष्पा सुभाष गायकवाड**
**मनपा – श्रीम. लक्ष्मीबाई कृष्णाजी जरग विद्यामंदिर,**
**जरगनगर, कोल्हापूर.**


✦✦✦

# पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा

दिनांक २६ जून, २०१३ पासून मी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, जोगीसाखरा येथे कार्यरत असून सत्र २०१८–२०१९ पासून इयत्ता ५ वी चा वर्गशिक्षक आहे. आमची शाळा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत असल्यामुळे शाळेत नावीन्यपूर्ण परिपाठ, सांस्कृतिक कार्यक्रम, दप्तरमुक्त शनिवार, परसबाग निर्मिती, फुलोरा, विज्ञानकोडे यांसारखे उपक्रम आमच्या शाळेत नियमितपणे राबवले जातात.त्यासाठी आमच्या केंद्राचे केंद्रप्रमुख माननीय कैलास टेंभुर्णे सर आम्हांला नेहमीच मार्गदर्शन करायला तयार असतात. त्यापैकीच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आमच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हा आमच्या नावीन्यपूर्ण उपक्रम व प्रयत्नांचाच एक भाग आहे.

सदर उपक्रमाची सुरुवात आम्ही शैक्षणिक सत्र २०१८–१९ पासून सुरू केली व यश मिळवत गेलो. खालील आकडेवारीवरून हे सहज लक्षात येईल.

| शैक्षणिक सत्र | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | पात्र असलेले विद्यार्थी | गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी |
|---|---|---|---|
| २०१८–१९ | १२ | ६ | ६ |
| २०१९–२० | १२ | ६ | ५ |
| २०२०–२१ | ७ | ० | ० |
| २०२१–२२ | १० | ४ | ४ |
| २०२२–२३ | १४ | ७ | ६ |

आमच्या शाळेचे हे यश शाळेत येणाऱ्या अधिकाऱ्यांकडून नेहमीच वाखाणले गेले आहे. यासाठी थोड्या वेगळ्या पद्धतीने प्रयत्न करण्याची गरज आहे. त्याचाच तपशील मी या लेखात देत आहे.

मागील शैक्षणिक सत्र २०२२–२३ मध्ये माझ्या वर्गात २९ विद्यार्थी होते. त्यापैकी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेकरिता १४ विद्यार्थी बसविले. १४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत झळकले पाहिजेत हा एकच ध्यास आम्ही सर्व शिक्षकांनी घेतला व त्या दृष्टीने जोमाने कामाला लागलो.

यासाठी आम्ही सुरुवातीला शिष्यवृत्ती परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा आकडा निश्चित केला. आमची शाळा ग्रामीण भागातील असल्याने विद्यार्थ्यांचे फार्म भरण्याची औपचारिकता आम्हांलाच पूर्ण करावी लागते. हे सोपस्कार पूर्ण झाल्यावर आम्ही प्रत्यक्ष अध्यापनास सुरुवात केली. त्यासाठी शाळा सुरू होण्याआधी एक तास जादा वर्ग घेण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला.

शिष्यवृत्ती परीक्षेत महत्त्वाचे चार विषय असतात. त्याची आम्ही विभागणी केली. त्यात भाषा विषयाचे पदवीधर शिक्षक बुल्ले सर यांच्याकडे इंग्रजी विषय, विषय शिक्षक हेमके सर यांचेकडे गणित व बुद्धिमत्ता व मी स्वतः भाषा विषय घेतला आणि आमच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या जादा वर्गांना सुरुवात झाली. अध्यापन करत असताना शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शिका व यू-टयूब वरील व्हिडिओंची आम्हांला खूप मदत झाली.

परीक्षेच्या एक महिना अगोदर आम्ही विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका देऊन उत्तर पत्रिका सोडवून घेतल्या. यामुळे विद्यार्थ्यांना नियोजित वेळेत पेपर सोडविण्याचा सराव झाला व त्यांच्या चुका लक्षात आणून दिल्या. या सराव पेपरमुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीत सुधारणा होत गेली.

**सराव चाचणीचे पेपर सोडविताना विद्यार्थी :**

प्रत्यक्ष निकाल लागल्यावर १४ विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थी परीक्षेत पात्र ठरले व त्यापैकी ६ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकल्याने केलेल्या श्रमाचे चीज झाल्याचे समाधान विद्यार्थी व शिक्षकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. हा आकडा जरी छोटा वाटत असला, तरीसुद्धा आमच्या आदिवासी जिल्ह्यातील पालकांची सामाजिक व शैक्षणिक बाजू बघता हे यश आमच्यासाठी देदीप्यमान असेच म्हणावे लागेल. आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे सत्र २०१८-१९ मध्ये १७० इतकी असलेली शाळेची पटसंख्या या सत्रात २०० पर्यंत पोहोचली हे विशेषतः नमूद करावे लागेल.

**श्री. आनंदकुमार हेमके,**

**जि. प. उ. प्राथ. शाळा जोगीसाखरा.**

✦✦✦

# ज्ञानी होऊया चिमुकल्यांसंगे ...

मूल जेव्हा शाळेत येते, तेव्हा त्याच्या अनुभवविश्वाशी अजून एक महत्त्वाचे अनुभवविश्व जुळत असते. त्याच्या अनुभवविश्वातून ते अनेक गोष्टी शिकून आलेले असते, शिकत असते. ते फक्त एक मातीचा गोळा नक्कीच नसते. ते तेव्हाही मातीचा गोळा नसते, जेव्हा ते जन्माला येते. आईच्या गर्भात सर्वांत आधी त्याची कर्णेंद्रिय विकसित झालेली असतात आणि म्हणून जन्मल्यानंतर त्याला आईच्या हृदयाशी लावताच आईच्या हृदयाचे ठोके ओळखून ते आईला ओळखू लागते. मूल जसजसे वाढू लागते, तसतसे कुटुंब, परिसर यातून अनेक गोष्टी निरीक्षणातून, अनुकरणातून शिकत असते; आणि म्हणून मूल जेव्हा शाळेत येते तेव्हा त्याला मातीचा गोळा ठरवून स्वतःला आकार देणारा कुंभार म्हणवून घेण्यात नक्कीच मोठेपणा नाही.

शाळा हे मुलांच्या विकासाचे एक औपचारिक केंद्र असते. अनेक गोष्टी त्यांना येथे जाणीवपूर्वक वेगवेगळ्या पद्धतीने सांगता येतात. चिकित्सक वृत्ती, कल्पकता, वैज्ञानिक दृष्टिकोन, नेतृत्व, सहकार्य, पुढाकार ही जीवनमूल्ये त्यांना अध्ययन कौशल्ये प्राप्त करून देता देता कशी विकसित होतील याचा विचार शाळेमध्ये शिक्षक करू शकतात; नव्हे तो करायलाच पाहिजे. २१ व्या शतकातील आव्हाने लक्षात घेता ते गरजेचे आहे.

या सगळ्याचा विचार करून मी माझ्या शाळेत, माझ्या वर्गाकरिता अनेक कृती व काही उपक्रम यांची जाणीवपूर्वक निवड करीत असते. छोटी मुले कृतीद्वारे लवकर शिकतात व त्यांना कंटाळा येत नाही हा अनुभव असल्यामुळे अध्ययन अनुभव कृतींद्वारे देण्याचा माझा सतत प्रयत्न असतो. सोबतच विशेष उपक्रम दरवर्षी राबवत असते. इयत्ता पहिलीसाठी (२०२१-२०२२) सुरू केलेला 'कुतूहल' हा उपक्रम आताही सुरू आहे. यात मुलांना चित्र, शब्द दाखवून कुतूहल निर्माण करणारे प्रश्न मी विचारते. उदा., सूर्याचे चित्र दाखवून उद्या सूर्य उगवलाच नाही तर? मुले लगेच विचार करू लागतात आणि आपण कल्पना करू शकत नाही अशी त्यांची उत्तरे हजर असतात. कल्पना करणे, तर्क करणे, चिकित्सा करणे यांची सवय त्यांना या उपक्रमातून लागते आहे. आपला परिसर, पर्यावरण यांशीही जवळीक साधण्यासाठी असाच एक परिसराशी जवळीक वाढावी, परिसरातील व्यवसाय कळावे या हेतूने 'परिसतील व्यावसायिकांची भेट व मुलाखत' हा उपक्रम घेतला. हा उपक्रम माझ्या सहकारी शिक्षिका अर्चना खैरे यांचा वर्ग ५ वी, व माझा वर्ग २ री असा मिळून घेतला. यात आम्ही मासे बाजार, कापड दुकान, फळबाजार, किराणा दुकान इत्यादींना भेटी दिल्या. यात जेव्हा आम्ही फळ विक्रेत्यांची मुलाखत घेत होतो आणि तो विक्रेता फळे आरोग्यासाठी किती फायदेशीर आहेत हे सांगत होता, तेव्हा इयत्ता ५ वी तील रितिक नावाचा विद्यार्थी त्यांना म्हणाला की, आतमध्ये (दुकानाच्या) दारू पण असते ना? त्या विक्रेत्याचा चेहराच पडला. त्या दिवशी मनात विचार आला त्या मोठ्या विक्रेत्याने आरोग्याचा पाठ दिला, की नकळत त्या मुलाने?

मागच्या वर्षीच इयत्ता २ री ला (२०२२-२०२३) द्वितीय सत्रात 'प्रिय डायरी' हा विशेष उपक्रम सुरू केला तेव्हा प्रतिसाद फार कमी मिळाला; पण सानिया नावाची मुलगी रोज डायरी लिहायची व मला दाखवायची. मी मध्येच २० दिवसांसाठी सुट्टीवर गेले होते आणि जेव्हा परत रुजू झाले, त्याच्या दुसऱ्या

दिवशी तिने मला तिची डायरी दाखवली. ज्यात मला शाळेत आलेले पाहून तिला किती आनंद झाला याबद्दल लिहिले होते, आणि त्या आधीच्या दिवसांत जेव्हा मी रजा होते तेव्हा तिला कसे करमत नव्हते याबद्दल लिहिले होते. हे वाचून माझ्या डोळ्यांत पाणीच आले आणि सुट्टी घेतल्याबद्दल उगाच अपराधीही वाटून गेले. या वर्षी ३० पैकी जवळपास १५ ते २० मुले डायरी लिहीत आहेत, त्यांच्या भावना व्यक्त करत आहेत.

इयत्ता १ ली पासून (२०२१-२०२२) अनेक कृतींद्वारे आनंददायी अध्ययन अनुभवांची सांगड मी घालत असल्यामुळे माझी मुले खरच अधिकाधिक कल्पक, रचनात्मक बनत चालली आहेत. याचा अनुभव मला अनेकदा येतो आहे. वर्गात 'पडघमवरती टिपरी पडली' ही कविता म्हणून घेत असताना त्यातील 'म्हातारी हरभरे भरडते' ही कविची कल्पना मी उलगडून सांगत होते, लगेच वंशिका खिडकीकडे बोट दाखवत म्हणाली, मॅडम आभाळ रडत आहे आणि सगळी मुले खिडकीबाहेर पाहायला लागली. बाहेर पाऊस पडत होता. तसेच सेतूमध्ये एक कृती आहे, कवितेच्या ओळी पूर्ण करा. त्यात आहे गोजिरवाणे बाळ, गळ्यात त्याच्या, मी काही बोलायच्या आत यश म्हणतो मॅडम मोत्याची माळ. मला खूप आश्चर्य वाटले कारण मलाही हे सुचले नव्हते. मी सुंदर माळ असे सांगणार होते. मुले खरेच दोन पावले आपल्या पुढे जात आहेत हे पाहून खूप आनंदही झाला. आमच्या विशेष उपक्रमांपैकी 'आठवडी सामान्यज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा' ही मुलांना खूप आवडते याचाही आनंद आहेच.

अध्ययन अनुभव देत असताना आम्ही खूप चर्चा करतो. ही चर्चा निसर्ग, विज्ञान, संवेदनशीलता, मानवी मूल्ये यांभोवती जास्त असते. मुले त्यांचे अनुभव न घाबरता सांगतात. कधीकधी आम्ही डोळे बंद करून मनानेच डोंगर, दरी, नदी, समुद्र, किल्ले येथे भटकून येतो.

खरे तर यातून मलाही स्वतःकडे नवीन नजरेने बघता येत आहे. रोज नवीन काहीतरी शिकता येत आहे. माझ्या आधीच्या अध्ययन अनुभव देण्याच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. दृष्टी अधिक सकारात्मक व निकोप झाली आहे. खरे तर ही लहान मुलेच तुम्हांला मोठी होण्यासाठी मदत करत असतात हे ज्ञान नव्हे, तत्त्वज्ञान मला माझ्या मुलांनी शिकवले आहे.

**माधुरी सेलोकर**

**जि. प. उ. प्राथ. शाळा पचखेडी (गा.)**

**प. स. कुही, जि. नागपूर.**

✦✦✦

# चंद्रयान उपक्रमातून विद्यार्थी संशोधनाकडे

रायगड जिल्हा परिषदेची आदर्श शाळा खरसई मराठी (मॉडेल स्कूल) ता. म्हसळा, जि. रायगड या शाळेतील शंभर टक्के विद्यार्थ्यांनी 'चंद्रयान या उपक्रमात' सहभाग घेऊन जगाच्या नकाशावर चंद्रयान मोहीम यशस्वी ठरवणारा आणि चंद्रावर दक्षिण ध्रुवाजवळ पहिल्यांदाच चंद्रयान उतरवणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. अशा वातावरणात चंद्रयान–३ हे अंतराळ यान १४ जुलै, २०२३ रोजी २ वा ३५ मि. बाहुबली रॉकेट एल.व्ही.एम.–३ पृथ्वीपासून चंद्रापर्यंतचा ३.८४ लाख किलोमीटरच्या प्रवास केल्यानंतरचा भारताचे चंद्रयान चंद्राच्या पृष्ठभागावर उतरेल असा संदेश भारताच्या मीडियाद्वारे प्रसिद्ध होत होते. अशा वेळी आमच्या रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा खरसई मराठी, केंद्र–वरवटणे, ता. म्हसळा, जि. रायगड या शाळेचे उपक्रमशील शिक्षक श्री. जयसिंग शंकर बेटकर यांनी शाळा स्तरावर 'चंद्रयान प्रकल्प उपक्रम' राबवण्याचे काम हाती घेतले. यामध्ये शाळेचे १०५ विद्यार्थी सहभागी झाले, शाळेचे १००% विद्यार्थी सहभागी होताना खूप आनंद झाला. विद्यार्थ्यांनी टाकाऊपासून टिकाऊ असे साहित्य जमा केले. स्वतःकडे असणारे रंगाचे साहित्य आणि शाळेतून – परिसरातून काही साहित्य एकत्र करून सुबक असे चंद्रयान तयार केले. विद्यार्थ्यांनी पालक व शिक्षणप्रेमी यांच्या मार्गदर्शनासह शाळेतील वर्गशिक्षकांच्या सहकार्याने विविध मॉडेल्स विद्यार्थ्यांच्या कल्पकतेने तयार केले. तसेच शाळेत 'विज्ञान नावीन्यपूर्ण प्रयोग' वर्गात सुव्यवस्थित मॉडेलचे विद्यार्थ्यांनी स्वतः बालशास्त्रज्ञ असल्यासारखे चिकित्सक पद्धतीने माहितीसह सादरीकरण केले. रायगड जिल्हा परिषदेच्या माननीय श्रीमती गुरव मॅडम यांनी आदर्श मॉडेल स्कूल खरसई मराठी शाळेला दि. २३ ऑगस्ट, २०२३ रोजी भेट दिली असता, शाळेतील बालशास्त्रज्ञांनी बनवलेले चंद्रयान मॉडेल सादर केले. उपस्थित गुरव मॅडम यांनी विद्यार्थ्यांना चंद्रयानबाबत प्रश्न विचारले आणि विद्यार्थ्यांनी अपेक्षित उत्तरे दिली. भारताचे चंद्रयान तीन लँडर आणि रोव्हर २३ ऑगस्ट, २०२३ रोजी संध्याकाळी ६.०४ वाजता चंद्राच्या दक्षिण ध्रुव प्रदेशाजवळ उतरले या मोहिमेमुळे भारत हा चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ अंतराळ यान यशस्वीपणे उतरणारा पहिला देश आणि चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करणारा जगातील चौथा देश आहे. याबाबत विद्यार्थ्याने सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर चंद्रयान–३ या मॉडेलबाबत सुरक्षितता मॉडेल हवेत झेपावणे हे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी करून दाखवले.

चंद्रावर रोव्हर फिरण्याची क्षमता व निरीक्षण कसे असेल, चंद्राची रचना, चंद्रावर रासायनिक व नैसर्गिक घटक, माती, पाणी इत्यादींवर वैज्ञानिक प्रयोग करणारे नवीन तंत्रज्ञानाचा विकास आणि प्रात्यक्षिक कार्यप्रणाली काय असेल याबाबत माहिती मॉडेल सादरीकरणाच्या वेळी विद्यार्थ्यांनी दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची भूगोल या विषयाची आवड व जिज्ञासा वाढीस वाव मिळाला. चंद्राच्या कला, दिवस व रात्र, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण यांसह चंद्रावर आपण ही जाऊ शकतो, तसेच भविष्यात राहू पण शकतो असे अनेक प्रश्न, समस्या, संवाद यांवर चर्चा झाली. खरसई शाळेतील विद्यार्थ्यांनी चंद्रयान या मॉडेल उपक्रमात सहभाग घेतलेल्या आणि सहभागी विद्यार्थ्यांची नोंद 'प्रथम' या संस्थेने घेऊन बालवैज्ञानिकांचे विज्ञानाविषयीचे मनोबल वाढवले.

चंद्रयान मोहीमेबाबत विद्यार्थ्यांनी घराघरात जनजागृती करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी हाती घेतलेला नावीन्यपूर्ण उपक्रम हा यशस्वीपणे पुढे घेऊन जाताना शालेय व्यवस्थापन समितीने महत्त्वपूर्ण सहकार्य केले. शाळेच्या मुख्याध्यापिका कोळसे मॅडम, सहकारी शिक्षक शेबांळे सर, थोरात सर, शिक्षणप्रेमी पयेर सर यांनी बहुमोलाचे सहकार्य केले.

**चंद्रयान उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) विज्ञानाने विकसित केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती करून घेणे.
२) अंतराळातील अंतरे मापनाची संकल्पना समजून घेणे.
३) चंद्रावरील वातावरण व परिस्थितीबाबत अनाकलनीय माहिती जाणून घेणे.
४) चंद्रयानाबाबत आधुनिक यंत्रणा समजून घेणे.
५) विद्यार्थ्यांच्या सर्जनशील विचार क्षमतेला चालना देणे.
७) विद्यार्थ्यांना चंद्रयान उपक्रम सोपे व सुलभ भाषेत समजावून देणे.
८) नवीन चंद्रयान मोहिमेत शोध लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या आधुनिक सामग्री यांचे विवेचन
९) चंद्र व चंद्रयानाबाबत नावीन्यपूर्ण माहितीचा शाळा स्तरावर विद्यार्थ्यांमार्फत प्रचार आणि प्रसार करणे.

**चंद्रयान उपक्रमाबाबत निष्पत्ती**


१) विद्यार्थी आधुनिक संशोधनात्मक साधनसामग्री व उपक्रम समजून घेतो.
२) चंद्रावर होणारा विकास आणि पुढील संशोधनात्मक दिशा विद्यार्थ्याने माहितीचे अवलोकन केले.
३) चंद्रयान व मानवाने चंद्रावर ठेवलेले पाऊल हे आधुनिकतेचे जागतिकीकरण लक्षण लक्षात घेतले.
४) विद्यार्थ्याला विज्ञानातून वैज्ञानिकाकडे विचार क्षमतेला वाव मिळाला.
५) प्रात्यक्षित कृतीयुक्त विद्यार्थी शाळा स्तरावर चंद्रयान उपक्रमात १००% सहभाग.
६) नावीन्यपूर्ण संकल्पना व अंतराळातील अंतरे मापन समजून घेतले.
७) विज्ञानाने विकसित केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती करून घेतली.
८) चंद्रावरील वातावरण, परिस्थितीबाबत अनाकलनीय माहिती जाणून, समजून घेतली.

**श्री. जयसिंग शंकर बेटकर**
**रा. जि. प. आदर्श शाळा खरसई मराठी,**
**ता. म्हसळा, जि. रायगड**
**भ्रमणध्वनी : ९२०९२७१८७२**

✦✦✦

# आदर्श शाळांमधील गुणवत्ताविषयक उपक्रम
## शिक्षक सुपरस्टार उपक्रम

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'आदर्श शाळा' योजनेच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या कार्यालयामार्फत राज्यातील निवडलेल्या ४८८ आदर्श शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून शाळांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे.




या अनुषंगाने गणित या विषयाच्या प्रभावी अध्यापनासाठी, तसेच अपेक्षित अध्ययन निष्पत्ती संपादणुकीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत खान ॲकॅडमीच्या पोर्टलवर गणिताचे ई–साहित्य निर्माण करून वापरासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सन २०२३–२४ च्या शैक्षणिक वर्षात 'शिक्षक सुपरस्टार' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**सदर उपक्रमाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :**

१) गणित विषयाच्या अध्ययन निष्पत्ती संपादणुकीत वर्ग अध्यापन तंत्रज्ञानाचा यशस्वीपणे व जास्तीत जास्त उपयोग करणाऱ्या शाळा व शिक्षकांना ओळख उपलब्ध करून देणे.

२) वर्गात गणित विषयाच्या अध्ययनात सातत्याने सुधारणा करण्याबाबत सन्मानित करणे.

३) यासंबंधी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा नोडल अधिकाऱ्यांना सन्मानित करणे.

गणित विषयाच्या संपादणुकीसाठी पोषक वातावरण तयार करण्यासाठी व वरील उद्दिष्टे संपादन करण्यासाठी वरील उपक्रमाची प्रस्तावित शैक्षणिक कार्यानिती खालीलप्रमाणे आहे.

१) शैक्षणिक वर्षातील तिमाही लक्ष्य प्राप्तीचे उद्देश ठरविणे.

२) संबंधित उद्दिष्ट प्राप्तीसाठी शिक्षकांचे वेळोवेळी स्मरण करून साहाय्य करणे.

३) प्रत्येक तिमाही उपक्रमातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळेला 'सुपरस्टार' म्हणून सन्मानित करणे.

४) वर्षाच्या शेवटी सातत्याने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळांना विशेष सन्मान प्रदान करणे.

संबंधित कार्यनितीची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षक प्रत्येक आठवड्यात विद्यार्थ्यांच्या गरजेनुरूप तयार करण्यात आलेल्या शैक्षणिक नियोजनाप्रमाणे विद्यार्थ्यांना संदर्भ साहित्य पोर्टलवर उपलब्ध करून देतील. तसेच त्या अनुषंगाने गणित विषयाच्या अध्ययन संपादणुकीत वाढ करण्यासाठी सर्व विद्यार्थी १२० मिनिटे प्रति माह किंवा ३० मि. आठवडा याप्रमाणे सराव करणे अपेक्षित आहे. या उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी गणित विषयाच्या अध्ययन–अध्यापनात तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून अध्ययन आनंददायी करणाऱ्या शिक्षकांना सन्मानपत्र, उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी शाळेला सुपरस्टार म्हणून सन्मान, तसेच संबंधित जिल्ह्यासाठी यशस्वीपणे उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा नोडल अधिकारी यांचा सन्मान याप्रमाणे उपक्रमाचे स्वरूप राहणार आहे.

## जुलै ते सप्टेंबर या कालावधीतील पोस्टर विजेते

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

### Shikshak Superstars Program

### QUARTER 2 WINNERS

| DISTRICT | SCHOOL NAME | REGISTERED STUDENT | NUMBER OF VERY ACTIVE LEARNERS |
|---|---|---|---|
| AMRAVATI | Z P PRE MID SCHOOL TONDGAON | 171 | 27 |
| SANGLI | Z.P.SCHOOL. KARUNGALI. | 385 | 60 |
| SATARA | Z.P.PS. MEDHA | 1374 | 189 |
| RAIGARH (MAHARASHTRA) | R.Z.P PRI. SCHOOL WAHOOR | 175 | 23 |
| RATNAGIRI | ZILLA PARISHAD SCHOOL PHANSU | 265 | 26 |
| PARBHANI | ZPPS SAWANGI (MHA) | 645 | 46 |
| BID | ZPPS RAKSHASBHUVAN (T) | 330 | 22 |
| PUNE | ZPPS WABLEWADI | 1327 | 87 |
| AHMADNAGAR | ZPPS RENUKANAGAR | 313 | 17 |
| OSMANABAD | ZILLA PARISHAD CENTRAL PRIMARY SCHOOL, KAJALA | 670 | 36 |
| NAGPUR | Z.P. UPS, AJANI | 363 | 14 |
| BULDANA | ZP CEN MAR PRI SCH,SAVARGAON DUKARE | 476 | 18 |
| GADCHIROLI | ZILLA PRISHAD UPPER PRIMARY SCHOOL, Yella | 384 | 12 |
| NASHIK | NMC SCHOOL NO 49 PANCHAK | 1569 | 49 |
| KOLHAPUR | MARATHI VIDYA MANDIR JANGAMHATTI | 687 | 20 |
| JALNA | ZILLA PARISHAD CENTRAL PARIMARY SCHOOL BAVANE PANGARI | 677 | 14 |
| NANDED | CPS BRANCH MUKHED | 831 | 17 |
| CHANDRAPUR | Z.P U. PRIMARY SCHOOL, CHINCHALA | 943 | 14 |

***Congratulations to all the Schools!***

***There are two more quarters left, we request you all to encourage the students to use Khan Academy!***

**KHAN ACADEMY SUPPORT**

**We request the district/ block representatives and teachers to actively call/ message our support team.**
- Teachers can **receive support or give feedback** to Khan Academy by calling **011 4116 8778 (Mon-Sat 9 AM to 6 PM)**
- **Khan Academy WhatsApp Number: 7303882661 (only message)**

✦✦✦


09:00